१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, सोमवार ६ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३१, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 31 Marathi - Daily - Mumbai, 6 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

बारामती निवडणूक: सुनेत्रा पवार की काँग्रेस?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

'आर्टेमिस'च्या अंतराळयात्रींनी टिपले चंद्र-पृथ्वीचे अद्भुत फोटो







■ वॉशिंग्टन

अमेरिकेची अंतराळ संस्था नासा सध्या राबवत असलेली आर्टेमिस-२ मोहीम आता चंद्राच्या दिशेने वेगाने पुढे सरकत आहे. या मोहिमेने आतापर्यंत प्रवासातील अर्ध्याहून अधिक अंतर पूर्ण केले आहे. यादरम्यान अंतराळवीरांनी टिपलेली चंद्र आणि पृथ्वीची आश्चर्यकारक आणि अद्भुत नवी छायाचित्रे नासाने पोस्ट केली आहेत.

या छायाचित्रांमधील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चंद्रावरील ओरिएंटेल खोरे (ओरिएंटेल बेसिन) या भागाचे प्रथमच मानवी डोळ्यांनी दर्शन झाले. सुमारे ९६५ किलोमीटर रुंद असलेले हे प्रचंड विवर चंद्राच्या जवळच्या आणि दूरच्या भागांमधील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. यापूर्वी हा भाग केवळ यांत्रिक साधनांच्या मदतीनेच पाहिला गेला होता. या मोहिमेतून मिळालेल्या छायाचित्रांमध्ये केवळ चंद्रच नव्हे, तर पृथ्वीचेही अप्रतिम दृश्य दिसते. अंतराळातून दिसणारी पृथ्वी निळ्या प्रकाशात उजळलेली दिसते. अपोलो मोहिमेनंतर इतक्या पान ७ वर

थोडक्यात...

अवकाळी पावसाचा तडाखा चंद्रपुरात वीजपुरवठा खंडित

चंद्रपूर-चंद्रपूर शहरासह जिल्ह्यात आज पहाटे विजांच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा पान ७ वर

चला हवा जाऊ द्या!
धौती-योग
चूर्ण व टॅबलेट्स
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
डॉ. अभिजीत 9422011723

बारामती पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसची उमेदवारी जाहीर

सुनेत्रा पवार यांचे प्रयत्न फोल! निवडणूक बिनविरोध नाही

■ बारामती

काँग्रेसने बारामतीमध्ये आकाश मोरे यांना उमेदवारी देऊन धनगर कार्ड वापरले आहे. बारामतीमध्ये धनगर समाजाच्या मतदारांची संख्या लक्षणीय आहे. काँग्रेसने धनगर समाजाचा उमेदवार दिल्याने हे सुनेत्रा पवार यांच्यासमोर आव्हान असेल. आज ओबीसी आंदोलक नेते लक्ष्मण हाके यांनीही या निवडणुकीत उतरण्याची घोषणा केली आहे. ते निवडणुकीत उतरले तर हे आव्हान आणखी कठीण होऊ शकते. काँग्रेसने ही घोषणा केल्यानंतर अजूनही याबाबत निर्णय उबाठा काय ठरवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने आज ॲड. आकाश मोरे यांना उमेदवारी जाहीर केली. त्याआधी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्याशी पाठिंब्यासाठी फोनवरून संपर्क साधला होता. काल त्यांनी उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनाही फोन केला होता. मात्र, काँग्रेस निवडणूक लढवण्यावर ठाम राहिल्याने त्यांचे प्रयत्न अपयशी ठरले. उद्या या निवडणुकीचा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती मतदारसंघात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर रिंगणात उतरल्या आहेत. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, असा प्रयत्न महायुतीकडून सुरुवातीपासून होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी पान ७ वर

राहुरीबाबतही मतभेद

बारामतीबरोबर राहुरी मतदारसंघातही पोटनिवडणूक होत असून ती लढण्यावरूनही मविआत मतभेद असल्याचे उघड झाले आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी, उबाठा आणि काँग्रेस या मविआतील तिन्ही पक्षात निवडणूक लढवण्यासाठी रस्सीरवेच सुरू आहे. या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने दिवंगत आमदार शिवाजी कार्डिले यांचे पुत्र अक्षय कार्डिले यांना उमेदवारी दिली आहे. मागील निवडणुकीत महाविकास आघाडीच्या जागावाटपात राहुरी विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडे होती. त्यावेळी प्राजक्त तनपुरे यांनी राष्ट्रवादीच्या 'तुतारी वाजवणारा माणूस' पक्षचिन्हावर निवडणूक लढवली होती. परंतु आता तनपुरे शरद पवार यांच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्यास इच्छुक नाहीत. त्यामुळे राष्ट्रवादीने उमेदवार देण्याची तयारी सुरू केली आहे. इथे काँग्रेसनेही उमेदवार देण्याचे जाहीर केले आहे. तर शिवसेना उबाठानेदेखील निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे. आज सिल्व्हर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी बारामती आणि राहुरी या दोन्ही पोटनिवडणुकीसंदर्भात राष्ट्रवादीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले की, राहुरीच्या बाबतीत महाविकास आघाडी म्हणून आम्ही काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षांशी चर्चा करून निर्णय घेऊ.

मिस्त्रींच्या याचिकेनंतर टाटा ट्रस्टचा वाद चिघळला! श्रीनिवासन यांचा राजीनामा

■ मुंबई

टाटा समूहाशी संबंधित धर्मादाय विश्वस्त संस्थांमधील वाद चिघळला आहे. माजी विश्वस्त मेहली मिस्त्री यांनी नियुक्ती प्रक्रियेवर आणि विश्वस्तांच्या पात्रतेवर प्रश्न उपस्थित करत धर्मादाय आयुक्तांकडे याचिका दाखल केली. यानंतर अवघ्या एका दिवसातच वेणू श्रीनिवासन यांनी 'बाई हिराबाई चॅरिटेबल ट्रस्ट'मधील आपल्या पदाचा राजीनामा दिला. अधिकृतरीत्या व्यावसायिक कारणे सांगितली जात असली, तरी या घडामोडीमुळे ट्रस्टमधील

अंतर्गत मतभेद, नियमांचे उल्लंघन आणि व्यवस्थापनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राजीनाम्याच्या एक दिवस आधीच टाटा समूहाशी संबंधित ट्रस्टचे माजी विश्वस्त मेहली मिस्त्री यांनी काही आरोप केला की, श्रीनिवासन आणि विजय सिंघ हे दोघेही ट्रस्टच्या मूळ करारनाम्यात नमूद केलेल्या पात्रतेच्या अटी पूर्ण करत नाहीत. याबाबत मिस्त्री यांनी या प्रकरणात ७ डिसेंबर १९२३ च्या मूळ ट्रस्ट करारनाम्याचा आधार घेऊन धर्मादाय आयुक्तांकडे याचिका दाखल करत पान ७ वर

मदरशांवर बुलडोझरच चालवा टी. राजा यांचे वादग्रस्त विधान

■ नांदेड

तेलंगणाचे आमदार टी. राजा सिंह यांनी महाराष्ट्रात पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. मंत्री नितेश राणे यांच्या विधानांचे समर्थन करत त्यांनी राज्यातील अनधिकृत मदरशांवर बुलडोझर चालवण्याची आणि औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथे शनिवारी रात्री झालेल्या सभेत बोलताना त्यांनी हे विधान केले. त्यांनी थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे ही मागणी मांडली. खुलताबाद येथील मुघल बादशहा औरंगजेबाची कबर उखडून टाकावी, असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना टी. राजा सिंह यांनी मंत्री नितेश राणे यांच्या वक्तव्याला पाठिंबा दर्शवला. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील पान ७ वर

एसआयटी चौकशीनंतर भोंदू खरातचा मुलगा नॉट रीचेबल

■ नाशिक

सिन्नर तालुक्यातील भोंदू बाबा अशोक खरात सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे, तर त्याची पत्नी कल्पना फरार आहे. या प्रकरणी नेमलेल्या एसआयटीने दोन दिवसांपूर्वी मुलगा हर्षवर्धनला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. चौकशीनंतर त्याला घरी सोडल्यावर तो नॉट रीचेबल असल्याची माहिती आहे. त्यामुळे तो पळून गेला असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणाचा तपास सुरू असताना एसआयटीचे पथक खरात कुटुंबावर लक्ष ठेवून आहे. या पार्श्वभूमीवर खरातची पत्नी कल्पनाला ताब्यात घेण्यासाठी पथक त्यांच्या घरी गेले, तेव्हा ती पळून जाण्यात यशस्वी ठरली. मात्र, त्यावेळी मुलगा हर्षवर्धनला चौकशीसाठी ताब्यात घेतले. दोन दिवस त्याची सखोल चौकशी झाली. पण चौकशीदरम्यान त्याने अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली नसल्याची माहिती आहे. यानंतर एसआयटीने त्याला घरी सोडले. मात्र, त्यानंतर हर्षवर्धनचा मोबाईल बंद असून तो संपर्कात नाही. तपास पथकाने त्याच्या निवासस्थानी जाऊन पाहणी केली असता तो तेथेही सापडला नाही. त्यामुळे तो चौकशीपासून पान ७ वर

अमेरिकेची मुदत इराणने फेटाळली

■ वॉशिंग्टन

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिलेला ४८ तासांच्या मुदतीचा इशारा तेहरानने स्पष्टपणे फेटाळला. अमेरिका असहाय्यता आणि घबराटीतून धमक्या देत आहे, असे इराणने म्हटले. इराणच्या केंद्रीय लष्करी मुख्यालय, खतम अल-अंबियाचे जनरल अली अब्दुल्लाही अलीआबादी यांनी ट्रम्प यांचा इशारा मूर्खपणाचा असल्याचे म्हटले.

अब्दोल्लाही अलीआबादी यांनी अमेरिकेच्या अल्टिमेटमला इशारा दिला. ते म्हणाले की,इराण अशा प्रकारच्या धमक्यांना भीक घालणार नाही. अमेरिकेकडून दिले जाणारे इशारे हे दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न असून त्याचा कोणताही परिणाम होणार नाही. पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि होर्मुजच्या सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या मार्गावरील संघर्ष हा केवळ इराणपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण जगाच्या ऊर्जा सुरक्षेशी पान ७ वर

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील ब्लॅक बॉक्स, सीव्हीआरची माहिती द्या

कुटुंबियांचे पंतप्रधानांना पत्र

■ अहमदाबाद

अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेला दहा महिने उलटल्यानंतर, पीडितांच्या सुमारे ३० कुटुबियांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून विमानाचा ब्लॅक बॉक्स आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरची माहिती देण्याची विनंती केली आहे.

कुटुंबियांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, आम्हाला आर्थिक मदत नको, आम्हाला सत्य जाणून घ्यायचे आहे. दुर्घटना का घडली? त्यामागे तांत्रिक बिघाड होता का? हे समजणे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. ही माहिती सार्वजनिक करणे शक्य नसेल, तर ती किमान कुटुंबियांना वैयक्तिकरित्या देण्यात यावी. कुटुंबियांनी या पत्राच्या प्रती विमान दुर्घटना अन्वेषण विभाग, नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय तसेच गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनाही पाठवल्या आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

१२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनकडे जाणारे बोईंग ७८७-८ प्रकारचे विमान उड्डाणानंतर काही वेळातच पान ७ वर

सीडीआर लीक प्रकरणी दमानियांची चौकशी? मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

■ नाशिक

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातील सीडीआर लीक प्रकरणावरून राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी दोन दिवसापूर्वी खरातचे सीडीआर तपशील जाहीर करून उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह राज्यातील नेत्यांवर आरोप केले होते. दमानिया यांना सीडीआर तपशील कसा मिळाला? यावरून राज्यात गदारोळ झाला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सीडीआर प्रकरणी चौकशीचे आदेश दिले. ते नाशिकच्या श्री स्वामीनारायण मंदिर येथील अ.भा. संत समितीच्या राष्ट्रीय कार्यसमिती बैठकीच्या समारोप कार्यक्रमाला उपस्थित होते.फडणवीस म्हणाले की, सीडीआर प्राप्त करून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. हा सीडीआर कशा पद्धतीने लीक झाला, तो कोणी लीक केला, या संदर्भातली चौकशी सरकार करणार आहे.

इराणमध्ये अडकलेले ३४५ मच्छीमार भारतात परतले

मुंबई - आखाती भागातील युद्धामुळे अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आहे. मात्र केंद्र सरकारने मोहीम राबवत ३४५ भारतीय मच्छिमारांना सुखरूप मायदेशी परत आणले. या मच्छिमारांनी अर्मेनिया मार्गे भारत गाठल्याची माहिती आहे. हे मच्छीमार इराणमध्ये नेमके कशामुळे अडकले होते, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी भारतीय नागरिकांच्या सुटकेसाठी मदत केल्याबद्दल अर्मेनियाचे परराष्ट्र मंत्री अरारत मिर्झोयान यांचे आभार मानले.

लोकलच्या दारात उभे राहून प्रवास हा निष्काळजीपणा नाही

मृतांच्या वारसाला भरपाई देण्याचे कोर्टाचे आदेश

गर्दीच्या वेळी लोकलच्या दारात उभे राहून प्रवास करणे हा निष्काळजीपणा नसून, मुंबईतील लोकलची भयावह गर्दी लक्षात घेता ती एक मजबुरी आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. धावत्या लोकल ट्रेनच्या दारातून पडून झालेल्या मृत्यू प्रकरणात रेल्वे प्रशासनाचा युक्तिवाद फेटाळून लावताना न्यायालयाने,अशा घटनांमधील पीडितांच्या नातेवाईकांना भरपाई देणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे.

■ मुंबई

२९ जानेवारी २०१२ रोजी बालकृष्ण भंडारी यांचा कल्याण- डोंबिवलीदरम्यान धावत्या लोकलमधून पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणी रेल्वे दावा न्यायाधिकरणाने मृताच्या वारसाचा नुकसानभरपाई दावा पान ७ वर

हिरेन हत्या प्रकरणी माफीचा साक्षीदार बनण्यासाठी दबाव! चालकाचा दावा

■ मुंबई

मार्च २०२१ मध्ये ज्या गाडीत ठाण्यातील व्यापारी मनसुख हिरेन यांची कथित हत्या करण्यात आली, त्या गाडीचा चालक असल्याचा आरोप असलेला मनीष सोनी याने विशेष राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणात 'माफीचा साक्षीदार (अप्रूव्हर) होण्यासाठी आपल्यावर दबाव टाकण्यात आल्याचा गंभीर दावा सोनीने केला आहे.

सोनीच्या म्हणण्यानुसार, १३ मार्च रोजी एका सुनावणीदरम्यान त्याला विशेष एनआयए न्यायालयात हजर केले जात असताना, स्वतः ला 'एस.के. सिंग' असे नाव सांगणाऱ्या आणि एनआयए अधिकारी असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीने त्याच्याशी संपर्क साधला. तू या प्रकरणात माफीचा साक्षीदार होण्यासाठी अर्ज कर, असे केल्यास तुला जामीन मिळवून देण्यासाठी एनआयए मदत करेल, असे त्या व्यक्तीने पान ७ वर

जैन समाजाच्या अल्पसंख्याक दर्जावर लोढांचा पुन्हा प्रश्न

■ मुंबई

राज्यात धार्मिक ओळख आणि अल्पसंख्याक दर्जाच्या प्रश्नावरून नवा वाद पेटला आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जैन समाज हा हिंदू संस्कृतीचाच अविभाज्य भाग असल्याचे म्हणत त्यांना दिलेला अल्पसंख्याक दर्जा पुन्हा विचारात घेण्याची गरज व्यक्त केली. त्यांच्या या विधानामुळे धार्मिक ध्रुवीकरणाच्या चर्चांना नवे वळण मिळाले.

मंगलप्रभात लोढा म्हणाले की,जैन धर्म हा स्वतंत्र नसून तो हिंदू संस्कृतीचाच अविभाज्य भाग आहे. त्यामुळे जैन समाजाने स्वतःला वेगळे मानण्याची गरज नसून, अल्पसंख्याक दर्जा सोडून मुख्य प्रवाहात यावे. मुघल आणि ब्रिटिश काळापासून फूट पाडा आणि राज्य करा या नीतीमुळे हिंदू समाजाचे विभाजन करण्यात आले. त्यानंतर काँग्रेसनेही हेच धोरण पुढे चालू ठेवत विविध समाजघटकांना वेगळे करून राजकीय फायदा घेतला. जैन समाज हा मूळतः भारतीय परंपरेतून आलेला असून, त्यांचे तत्त्वज्ञान, आचार- विचार आणि जीवनपद्धती ही हिंदू संस्कृतीशी जोडलेली आहे. अशा समाजाला वेगळा अल्पसंख्याक दर्जा देणे म्हणजे सांस्कृतिक एकात्मतेला धक्का देणारे आहे. एकेकाळी २२ ते २३ टक्क्यांच्या आसपास असलेली जैन समाजाची लोकसंख्या ३ टक्क्यांपर्यंत घटली आहे.

छोट्या जाहिराती

संपर्क करा

८४२२८१७४४५/८१०८११६४२३

पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटसाठी 12/24 तास आया, वॉर्डबॉय पाहिजेत. पगार (30,000-90,000) **9820628009** {NC254722}

मुंबई, नवीमुंबई आणि ठाणे विभागाची माहिती असलेला सॉर्टींग सुपरवायझर पाहिजे. पगार 23,000/-+ 2000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस. संपर्क- **9820385767/ 7208993036** {NC260005}

मुंबईमध्ये लिफ्ट इन्स्टॉलेशन आणि हेल्परसाठी मुले पाहिजेत आकर्षक पगार.: वर्गीस बने. **9869085202** {NC2560007}

वॉर्डबॉय आणि आया घरी नोकरी. महिना १८,००० ते २४०००/- पगार. आठवड्याचे वेतन. १००% नोकरीची हमी १२/२४ तास ड्युटी, १ वर्षाचा अनुभव आवश्यक. वाचन आणि लेखन अनिवार्य. वयोमर्यादा २०-४५. संपर्कः- CARE24, ऑफीस नंबर ५१५, पाचवा मजला, शॉपर्स पॉईंट, अंधेरी पश्चिम. स्टेशनसमोर. शुभम- **8879811238.** {NC254530}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजेत (चिंचपोकळी, काळाचौकी)- सेंट्रल लाईनला राहणारे- १) ऑफसेट मशीन बॉयलर २) लॅमिनेशन ऑपरेटर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) हेल्पर आणि मशीन ट्रेनी ऑपरेटर ५) गारमेंट लेबल (फ्लेक्सो) प्रिंटिंग ऑपरेटर ६) डीटीपी ऑपरेटर (प्रीप्रेस) फोकस, २२ (ए) १, हकोबा कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमिल, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) **7045333202** {NC254725}

घरातील रुग्णाची काळजी घेण्यासाठी ब्युरोमध्ये अनुभवी आया आणि वॉर्डबॉय १२ तासांसाठी पाहिजे. पगार 21,000/- **9920463209** {NC254721}

प्रिंटिंग आणि गारमेंट क्षेत्रातील हेल्पर आणि कारागीर पाहिजेत कुर्ला (पुर्व) **9833380922** {NC260036}

पाहिजेत

डिलीव्हरी बॉय/ बायकर्स- पार्ट/फुलटाईम DTDC कुरीयर शॉप १/२, शिंदे निवास, कार्टररोड नंबर ६, बोरिवली ईस्ट **9323766047/ 8451015519** {NC254727}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजेत (कल्याणसाठी)- सेंट्रल लाईनला राहणारे- १) हेडलबर्ग ऑफसेट प्रिंटर २) ऑफसेट मशीन बॉयलर ३) स्क्रीन प्रिंटर ४) लॅमिनेशन ऑपरेटर ५) पंचिंग मशीन ऑपरेटर ६) हेल्पर आणि पॅकींग ७) गारमेंट लेबल (फ्लेक्सो) प्रिंटिंग ऑपरेटर. फोकस, गाला नंबर सी-१, रवारिया इंडस्ट्रियल इस्टेट, भिवंडी कोण रोड, कल्याण वेस्ट **9821434502/ 7045333202** {NC254735}

अंधेरी ईस्टमध्ये कुरीयर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत ॲशियानेट लॉजिस्टिक- **8169050216** {NC260030}

गोवंडी आणि मीरारोड येथे सोसायटी आणि ऑफीस हाऊसकीपिंगसाठी स्टाफ पाहिजेत. संपर्क नितीन- **9082792645/ 8329883194** {NC254716}

मिठाईच्या दुकानात हाऊसकीपिंगसाठी तरुण अनुभवी मुलगा 9 तास 13200/- बोरीवली, घाटकोपर **9699927271** {NC254736}

घरकामासाठी (10/12/24 तास) बेबीकेअर/ जापाबाई आणि कुकींगसाठी अनुभवी ''बायका/ मुली'' पाहिजेत. पगार 20,000/- ते 40,000/- रंजीतसर **9321417007/ 9892575886** दादर वेस्ट {NC254740}

फास्ट फुडसाठी हेल्पर पाहिजेत सकाळी ८ ते ४.३० दुपारी ३ ते ११ **8691962096** {NC260017}

पाहिजेत टर्नर, फिटर, हॉबिंग, गिअर ग्राइंडिंग ऑपरेटर. मीरा रोड. **7304883376** {NC260039}

पाहिजेत

कोलाबा येथे रेस्टॉरंटसाठी हेल्पर, वेटर, ऑर्डर टेकर, मोरी बॉय, किचन हेल्पर आणि ज्यूस मेकर पाहिजेत. संपर्क- **9004480008** {NC260033}

इमिटेशन कंपनीत पॅकींग कामासाठी मुली/ मुले पाहिजेत. मालाड पूर्वः **7710076282** {NC260021}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारी माणसे पाहिजे. पगार- 12,000 + गाडी भाडे + कमिशन **8356824867** {NC260049}

पाहिजेत हेल्पर-११,०००/-, वेल्डर-१८,०००/-, फायबर मोल्डर- १८,०००/-, संपर्कः- **9869050766** {NC260042}

दादरयेथे आऊटडोअर मार्केटिंग व ऑफिस कामासाठी पुरुष कर्मचारी हवेत, संपर्कः- **8291044924** {NC260045}

फॅक्टरीमध्ये कामासाठी हेल्पर पाहिजेत दीपक हार्डवेअर मार्ट लोअर परेल 9 ते 6 संपर्कः- **7021428720** {NC260046}

प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर, बाईंडर पाहिजे, जुईनगर, तुर्भे, रफीकभाईशी संपर्क कराः- **9820433482** {NC260047}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे- वांद्रे, वरळी रेस्टॉरंटसाठी. पगार-१८,०००+ PF, ESIC, जेवण, दोन सुट्टी. संपर्कः- **8291856090 / 8291107497** {NC260043}

बिस्लेरी बॉटलच्या डिलिव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्कः- **9892307267 / 7666255660** {NC260044}

Situation Vacant

Required 1) Sale's Executive (Full time) 2 yrs exp., in FMCG Mktg & campaigning (part time) 2) Accountant Min. 2 yrs exp. knowledge of Tally ERP GST filling, finalization & Msoffice. Contact: **9819257209/ 022-24221412** {NC260038}

जागाविषयक

दादर (पूर्व) स्टेशन नजिक ऑफिस करता जागा भाड्याने उपलब्ध. समर्थ- **9372532829** {NC254741}

व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC254675}

फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन/ ट्रेनिंग): **9136034519, 8369152017** {NC254638}

शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260031}

शेअर मार्केट

शेअर मार्केट शिका / रेफर करा / कमवा प्रत्यक्षात भेटा ठाणे- **9594060848** {NC254706}

वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

-मॅनेजर, 'नवाकाळ'

निशांत कुमार बिहारचे भावी मुख्यमंत्री पाटण्यात जेडीयू कार्यालयाजवळ फलक

■ पाटणा

बिहारचे माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा मुलगा 'निशांत कुमार बिहारचे पुढील मुख्यमंत्री' असे फलक पाटणा येथे जनता दल युनायटेड (जेडीयू) कार्यालयाजवळ झळकले आहेत.

या फलकांमध्ये नितीश कुमार यांचा चेहरा ठळकपणे दाखवण्यात आला असून, निशांत कुमार यांना बिहारचे भावी मुख्यमंत्री म्हणून उल्लेख केला आहे. जेडीयू कार्यकर्त्यांनी या माध्यमातून विकसित बिहार-२०४० ही संकल्पनाही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. फलकांवर विविध घोषणाही देण्यात आल्या आहेत. नितीश कुमार यांसारख्या नेत्यांची (क्लायमेट लीडर) वचने पूर्ण करण्यासाठी निशांत तयार असताना, नव्या चेहऱ्याची गरज काय? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. तसेच नितीश सेवक माँगे निशांत ही घोषणा ठळकपणे झळकत आहे. हे फलक जेडीयूच्या विद्यार्थी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष कृष्ण पटेल यांनी लावल्याची माहिती आहे.

शबरीमला प्रकरणी ९ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ७ एप्रिलपासून सुनावणी

■ नवी दिल्ली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

केरळमधील शबरीमला मंदिर प्रवेश प्रकरणावर आता सर्वोच्च न्यायालयात ९ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ७ एप्रिलपासून सुनावणी होणार आहे. ही सुनावणी केवळ या मंदिरापुरती मर्यादित नसून, धार्मिक स्वातंत्र्य, महिलांचे अधिकार आणि समानता यांसारख्या महत्त्वाच्या घटनात्मक प्रश्नांवरही त्यात उहापोह करणार आहे.

या खंडपीठाचे नेतृत्व सरन्यायाधीश सूर्य कांत करणार असून त्यांच्यासोबत न्या. बी. व्ही. नागरत्ना, एम. एम. सुंदरेश, अहसानुद्दीन अमानुल्ला, अरविंद कुमार, ऑगस्टीन जॉर्ज मसीह, प्रसन्न बी. वराळे, आर. महादेवन आणि जॉयमाल्या बागची यांचा समावेश आहे. मंदिरात १० ते ५० वयोगटातील महिलांना प्रवेशबंदी होती. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी रद्द करत सर्व वयोगटातील महिलांना मंदिरात प्रवेशाची परवानगी दिली होती.

कुल्लूमध्ये पर्यटक बस दरीत कोसळून ४ ठार

■ कुल्लू

हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्यातील बंजार विभागात औट-लुहरी-सैंज राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३०५ वर सोझा परिसरात रात्री उशिरा पर्यटकांनी भरलेली प्रवासी बस दरीत कोसळून अपघात झाला.

या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला असून १८ जण जखमी झाले आहेत. टेम्पो ट्रॅव्हलर बसमध्ये एकूण २२ जण प्रवास करत होते. यात २० प्रौढ आणि २ मुलांचा समावेश होता. हे सर्व पर्यटक जलोडी जोत परिसरातून फिरून बंजारकडे परत येत असताना सोझा जवळ अचानक बस खोल दरीत कोसळली.

देश विदेश

अमेरिकेत बेपत्ता मुलगी तब्बल ३२ वर्षांनंतर सापडली

■ वॉशिंग्टन

अमेरिकेतील रिझोना राज्यात १९९४ मध्ये बेपत्ता झालेली १३ वर्षीय क्रिस्टिना मारिया प्लांटे तब्बल ३२ वर्षांनंतर जिवंत सापडली आहे. सध्या तिचे वय ४५ वर्षे आहे.

क्रिस्टिना १५ मे १९९४ रोजी घरातून बाहेर पडली होती, मात्र त्यानंतर ती अचानक बेपत्ता झाली. पोलिसांनी दीर्घकाळ शोधमोहीम आणि तपास केला, पण कोणताही ठोस धागा लागला नाही. तिची नोंद हरवलेल्या मुलांच्या नोंदवहीत करण्यात आली होती आणि कालांतराने हे प्रकरण बंद झाले. अलीकडे प्रगत तपास पद्धतींचा वापर करून या प्रकरणाचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यातून काही नवे धागेदोरे समोर आले आणि अखेर क्रिस्टिनाचा शोध लागला. अधिकाऱ्यांनी तिची ओळख निश्चित केली असून, गोपनीयतेच्या कारणास्तव अधिक तपशील जाहीर करण्यात आलेले नाहीत.

अफगाणिस्तानात पूर व भूस्खलन १० दिवसांत ७७ मृत्यू! १३७ जखमी

■ काबूल

अफगाणिस्तानमध्ये मुसळधार पाऊस, पूर, भूस्खलन आणि वीज कोसळण्याच्या घटनांमुळे गेल्या दहा दिवसांत ७७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १३७ जण जखमी झाले आहेत. ही माहिती देशाच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे.

मागील ४८ तासांतच २६ जणांचा मृत्यू झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. या आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. आतापर्यंत ७९३ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, आणखी २,६७३ घरांचे नुकसान झाले आहे. तसेच, पूर आणि भूस्खलनामुळे सुमारे ३३७ किलोमीटर लांबीचे रस्ते खराब झाले आहेत. याशिवाय शेतजमीन, पाण्याच्या विहिरी, सिंचन कालवे आणि विविध व्यवसायांचे मोठे नुकसान झाले.

पाकिस्तान नौदलात मिलगेम श्रेणीची युद्धनौका सामील

■ कराची

पाकिस्तान नौदलाने आपल्या ताफ्यात दुसरी मिलगेम-श्रेणीची युद्धनौके सामील केले. या युद्धनौकेला पीएनएस खैबर नाव देण्यात आले आहे. या जहाजासाठी पाकिस्तानने तुर्कीची सरकारी संरक्षण कंत्राटदार कंपनी एएसएफएटीसोबत करार केला आहे. करारानुसार या कंपनीने पाकिस्तानला याआधीही एक युद्धनौके सुपूर्द केले होते.या करारानुसार दोन युद्धनौके तुर्कस्तानमध्ये आणि उर्वरित दोन युद्धनौके पाकिस्तानात बांधण्याचे ठरले होते.

पीएनएस खैबर या युद्धनौकेच्या समारंभात पाकिस्तानचे नौदल प्रमुख ॲडमिरल नवीद अश्रफ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थिती लागली होती. त्यावेळी नवीद अश्रफ यांनी सांगितले की, आपल्या नौदलाला अत्याधुनिक प्लॅटफॉर्म आणि विशेष तंत्रज्ञानाने सुसज्ज केले जात आहे.

आजचे राशी भविष्य

सोमवार ता. ६ एप्रिल २०२६

ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

मेष	स्वतःवर ताबा ठेवा आणि चुका टाळण्याचा प्रयत्न कटाक्षाने करा. संयम व निर्धाराने सफलता मिळेल.
वृषभ	नवीन ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. पैशाचा ओघ चांगला राहील.
मिथुन	यशदायक दिवस आहे. सर्व आघाड्यांवर सफलता मिळेल. प्रगतीचा नवा टप्पा गाठाल.
कर्क	संयम आणि शांतपणा महत्त्वाचा ठरेल. नियोजन आणि कार्यवाहीचे कौशल्य उपयोगी राहील. तीर्थाटनाचे योग आहेत.
सिंह	संयमाने सफलता मिळवता येईल. सातत्य महत्त्वाचे राहील. कामाचा ताण काहीसा वाढेल.
कन्या	स्वप्नपूर्तीचा दिवस आहे. सगळ्या प्रार्थना फळाला येतील. आनंदी आणि उत्साही राहाल.
तूळ	काटेकोर नियोजन सफलता देईल. अतिरिक्त जबाबदाऱ्या पेलाव्या लागतील. ताणतणाव दूर ठेवा.
वृश्चिक	भावंडाबरोबर कुरबुरीची शक्यता आहे. जोडीदाराशी गोडीत बोला. कामानिमित्त भरपूर फिरावे लागेल.
धनु	निराशेचा पगडा राहील. मात्र नकारात्मक विचारांना थारा न देणे हिताचे राहील. संवादातून नाती दृढ होतील.
मकर	उत्तम दिवस आहे. सर्व आघाड्यांवर यश लाभेल. इच्छापूर्तीचा दिवस राहील.
कुंभ	दीर्घकालीन नियोजनासाठी आजचा दिवस चांगला राहील. मात्र मोठे निर्णय लांबणीवर टाका. योग्य कारणाने खर्च होईल.
मीन	संयम वाढवावा लागेल. कामात चुका टाळण्यासाठी काटेकोर राहा. जोडीदाराबरोबरचे नाते दृढ करण्याचा प्रयत्न करा.

गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 14 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 05/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-	MG-04 : 3219
दुसरे बक्षिस रु. 5000/-	8918
तिसरे बक्षिस रु. 2000/-	7674
चौथे बक्षिस रु. 1000/-	4136 4192 4235 4245 5312 6500 6935 7869 8137 9536
पाचवे बक्षिस रु. 500/-	0228 0312 2743 4979 5020 5910 6310 6721 7790 9300
	5041 5702 6513 6932 7537 7955 8402 8616 8839 9210
सातवे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)	[illegible]

महाराष्ट्र गजलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 14 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 05/04/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/-	GL-01 : 5003
दुसरे बक्षिस रु. 5000/-	0886 2377 2596 2912 4721 5627 7551 8710 9391 9433
तिसरे बक्षिस रु. 1000/-	1367 1429 2142 2819 5829 6327 7169 8292 9121 9981
चौथे बक्षिस रु. 500/-	0899 1574 1913 2154 5071 5600 6988 8684 8836 8934
पाचवे बक्षिस रु. 200/-	0007 0953 3455 3715 4995 5147 5786 6822 7005 7715
सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)	[illegible]

महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 14 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 05/04/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/-	MO-03 : 1427
दुसरे बक्षिस रु. 2000/-	0102 1177 1505 1925 3670 5750 4984 6927 7168 7452
तिसरे बक्षिस रु. 1000/-	0471 4136 5021 5191 5769 5990 6236 6306 7255 9749
चौथे बक्षिस रु. 500/-	1761 2293 2626 2947 4596 5065 5886 6252 6844 7662
पाचवे बक्षिस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)	[illegible]

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

शुभ राशी ता.०६/४/२०२६

७	३	८
७१	३०	८२
७६	३५	८७
१२४	१३९	१८९
३४०	२३८	२४८

जव्हारमधील दगड खाणींमुळे स्थानिकांच्या जीवाला धोका

■ पालघर

जिल्ह्यातील जव्हार तालक्यात मोठ्या प्रमाणात गौण खनिज संपत्ती उपलब्ध आहेत. तसेच इमारत व रस्ते बांधकामांसाठी लागणाऱ्या दगडांसाठी येथे मोठ्या प्रमाणात उत्खनन होते. मात्र याच दगड खाणींसाठी होणाऱ्या स्फोटांमळे स्थानिक नागरिकांच्या घरांना तडे जात असल्याने त्यांचा जीव धोक्यात आला आहे. हे उत्खनन नियमांचे उल्लंघन करून केले जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

घराला तडे, धुळीमुळे पिकांचेही नुकसान

वास्तविक, जव्हारमधील हा दगड खाणींचा प्रश्न अनेक वर्षांपासूनचा आहे. येथील खाणींमध्ये होणाऱ्या स्फोटांमळे घरांना तडे जाणे, धूळ व ध्वनिप्रदूषण, तसेच जमिनीला हादरे बसत असल्याने भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत आटत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पर्यावरणावरही गंभीर परिणाम दिसून येत आहे. यासंदर्भात प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी अशी मागणी स्थानिक रहिवासी करत आहेत.

हार्बर रेल्वे मार्गावरील लोकल सेवा ठप्प

मुंबई - हार्बर रेल्वे मार्गावरील जुईनगर ते नेरुळ स्थानकादरम्यान ओव्हरहेड वायर तुटल्यामुळे वाशी ते पनवेलदरम्यानची लोकल वाहतूक ठप्प झाली. परिणामी रेल्वे प्रशासनाला नाईलाजाने वाशी ते सीएसएमटी स्थानकादरम्यान लोकल सेवा सुरू ठेवावी लागली. या घटनेची माहिती मिळताच रेल्वेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले.

मुंबईत २ दहशतवाद्यांना अटक

■ मुंबई

कुर्ला आणि कल्याणमधील खडवली परिसरात महाराष्ट्र एटीएस व दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने आज संयुक्त कारवाई करुन जैश-ए-मोहम्मद आणि आयएसआयएसशी संबंधित दोन संशयित दहशतवाद्यांना अटक केली.

हे दहशतवादी मुंबई आणि दिल्लीत टॉय कार बॉम्बच्या साहाय्याने मोठा स्फोट घडवण्याचा कट रचत होते. कामरान उर्फ सोनू उर्फ मोझे आणि बडा इम्रान असे अटक केलेल्या संशयित दहशतवाद्यांचे नाव आहे. या दोघांना दिल्ली पोलिसांच्या विशेष सेलकडे सोपवण्यात आले. 'मिशन खिलाफत' व 'सोल्जर्स ऑफ प्रॉफेट' यांसारख्या नेटवर्कशी जोडलेले होते. त्यांच्याकडून मोबाईल आणि लॅपटॉप यासारखे इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स जप्त करण्यात आले असून त्यातून डिजिटल रोडमॅप सापडला आहे. यापूर्वी मार्च २०२६ मध्ये एटीएसने कुर्ला आणि गोवंडी परिसरात छापे टाकून संशयितांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.

लग्नाच्या वरातीत पुतण्याकडून काका व चुलत भावाची हत्या

■ वर्धा

वर्धा शहरातील महिला आश्रम परिसरात हनुमान मंदिराजवळ लग्नाची वरात सुरू असतानाच एका तरुणाने आपल्या सख्ख्या काकाचा आणि चुलत भावाचा चाकूने वार करून हत्या केली. प्रभाकर भलमे आणि नितीन भलमे अशी मृतांची नावे आहेत. हल्लेखोर हा अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येत आहे. काल रात्री नातेवाईकांच्या लग्नसमारंभात ही घटना घडली.

लग्नाची वरात हनुमान मंदिरात दर्शन घेऊन पुढे जात असताना, संपत्तीच्या वादातून आरोपीने अचानक काका प्रभाकर भलमे आणि चुलत भाऊ नितीन भलमे यांच्यावर चाकूने सपासप वार केले. हल्ल्यावेळी प्रभाकर भलमे यांनी स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर उपस्थित नातेवाईकांनी जखमींना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दोघांनाही मृत घोषित केले. दरम्यान, भलमे कुटुंबियांमध्ये संपत्तीच्या वादातून काही महिन्यांपासून वाद सुरू होता. सुमारे आठ महिन्यांपूर्वीही आरोपी आणि मृतांमध्ये वाद झाला होता. आरोपीने आधीपासूनच कट रचून ऑनलाईन चाकू मागवला होता, असेही समजते.

पोलिसांनी अटकपूर्व नोटीस व्हॉट्सॲपद्वारे पाठवणे अवैध

■ बंगळूरु

उच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण

भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम ३५ (३) नुसार पोलिसांना अटकपूर्व नोटीस किंवा एफआयआरची प्रत व्हॉट्सॲप किंवा ईमेलद्वारे पाठवण्याचा अधिकार नाही, कायदेमंडळाच्या हेतूनुसार, अटकपूर्व टप्प्यावर नोटीस प्रत्यक्ष स्वरूपात बजावणे अनिवार्य आहे, असे कर्नाटक उच्च न्यायालयाने एक निकाल देताना स्पष्ट केले. एका फसवणूक प्रकरणातील आरोपीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. युगदेव आणि त्यांच्या पतीने योग शिक्षक असल्याचे भासवून 'जय भैरवी देवी' नावाची कंपनी चालवून तक्रारदारांकडून गुंतवणूक गोळा केली होती.या जोडप्याने गुंतवणुकदारांची सूमारे ९८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. अड़गोडी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. आरोपी ४० दिवस पोलिसांना चकवा देत असल्याने त्याला १७ जानेवारी रोजी अटक करण्यात आली.

तो रोज येऊन तीन तास बसायचा - पण माझ्या कॅफेतील सर्वात स्वस्त पदार्थ म्हणजे ब्लॅक कॉफी मागवायचा. (नंतर जेव्हा त्याचं येणं बंद झालं, तेव्हा त्याची मुलगी आली एकदा.) त्याची ही गोष्ट.....

जागा

मी शिवाजी पार्कच्या कोपऱ्यावर एक छोटंसं कॅफे चालवतो. फार काही आलिशान नसलं तरी काही लाकडी टेबल्स, उबदार प्रकाश, आणि नेटकं.... थोडक्यात अगदी पूर्वीच्या इराणी हॉटेल्सची प्रचिती देणारं ..... एका कुटुंबासारखेच असणारे नियमित ग्राहक... बरेचसे रोज हजेरी लावतात.... असं एक ठिकाण.

म्हणूनच तो पहिल्यांदा आत आला, तेव्हा माझं लक्ष त्याच्याकडे गेलं.

वयस्कर ... बहुधा सत्तरीच्या उत्तरार्धात असावा. (माझं व्यक्तीच्या दिसण्यावरून केलेलं वयाचं भाकीत सहसा चुकत नाही). थोडं विरलेलं जॅकेट, जुने आणि काहीसे झिजलेले बूट...आपल्याच तंद्रीत असलेला असा तो....अत्यंत संथ पण काहीशी डौलदार चाल.... एका दृष्टीक्षेपात मी हेरलेलं हे त्याचं व्यक्तिमत्व!!

त्याने मेनूमधला सर्वात स्वस्त पदार्थ मागवला- एक छोटा मग ब्लॅक कॉफी. आणि मग तो खिडकीजवळच्या त्या टेबलवर बसला.

तीन तास.....

तो आपला मोबाईल स्क्रोल करत नव्हता. पुस्तक वाचत नव्हता. थोडक्यात आपला वेळ घालवणे या अर्थाची एकही कृती म्हणून नाही. फक्त शांतपणे बसून बाहेरून जाणाऱ्या लोकांचं निरीक्षण चाललं असावं बहुधा.

दुसऱ्या दिवशी तो पुन्हा आला.

तीच कॉफी.

तेच टेबल.

तसेच तीन तास.

आणि तो येतच राहिला.

आठवड्याच्या शेवटी इतर ग्राहकांची कुजबुज सुरु झाली ..... हा उगाच जागा का अडवतोय.... फक्त एक कॉफी तर घेतो, तर एवढा वेळ का बसावं? काही उद्योग असेल असं नाही वाटंत .... काही घरदार आहे की नाही की बायकोच्या जाचातून सुटण्याची ही युक्ती?

पण त्याच्यात काहीतरी वेगळं नक्कीच होतं.

तो जातांना नेहमी मनापासून आभार मानून जायचा आणि महत्त्वाचं म्हणजे आपलं टेबल स्वतः हून स्वच्छ करूनही..... आणि हो.. आठवणीनं थोडीशीच चिल्लर पण टिप म्हणून ठेवायचा. मला जाणवलं होतं की ती एक कॉफीसुद्धा त्याच्या बजेटवर भार असावी. पण तरीही... की म्हणूनच?.... मी त्याला बसू देत असे.

एक दिवस, मी त्याला कॉफी बरोबर एक बिस्किटसुद्धा दिलं. ,माझ्याकडे कृतज्ञतापूर्वक दृष्टीक्षेप टाकत म्हणाला....पण मी हे ..... मी त्याला पुढे बोलूच दिलं नाही. हे on the house आहे. मी म्हटलं. त्यानं आदरपूर्वक मान हलवली. धन्यवाद तो म्हणाला.

पुढच्या आठवड्यात मी त्याला एक गार्लिक ब्रेड दिला. कधी कधी अमूलचा छोटा कप आईसक्रीम ही. त्याने मात्र कधीही त्या एका कॉफीशिवाय काही मागितलं नाही की कधी कसली तक्रार केली नाही. हां .... धन्यवाद मात्र आवर्जून देत असे.

तो फक्त शांतपणे बसायचा, जणू माझं कॅफे त्याच्यासाठी अत्यंत सुरक्षित जागा होती.

कालांतराने मला त्याचं नाव कळलं - अरविंद.

त्याची पत्नी दोन वर्षांपूर्वी निधन पावल्याचंही त्यानं सांगितलं. मला आता त्या शांत घरात करमत नाहीसं झालंय....इथे आल्यावर कसं अवतीभवती सतत वर्दळ जाणवते, जिवंतपणा जाणवतो

हे त्याचं वाक्य कायम माझ्या मनात रुंजी घालत राहिलं.

तो खाण्यासाठी किंवा कॉफीसाठी येतच नव्हता. कॉफी केवळ निमित्त होतं... तो येत होता इथल्या काहीशा कौटुंबिक वातावरणासाठी, संवादासाठी आणि कदाचित सततच्या मर्यादित लगबगीसाठी.... एकटं वाटण्यापासून सुटकेसाठी.

मग एक दिवस, तो आलाच नाही. मी स्वतःशी म्हटलं - आजारी असेल बहुतेक.... दुसऱ्या दिवशीही नाही आला. एक आठवडा गेला..... मग दोन.

नंतर बहुधा दररोज दुपारी सव्वादोनच्या सुमारास वाजता.... त्याच्या नेहमी यायच्या वेळेस.....माझी नजर नकळत दरवाज्याकडे वळू लागली. काहीशा काळजीने....

सुमारे एक महिन्यानंतर, साधारण माझ्याच वयाची एक महिला कॅफेत आली. काहीशा शोधक नजरेने कॅफेवर नजर टाकून माझ्याकडे पाहून मला म्हणाली तुम्हीच मालक ना? मी मान डोलवली. अरविंद....माझे वडील इथे येत असत. माझ्या मनात नको ती शंका आली. हो.... पण गेल्या काही दिवसांपासून ते आलेले नाहीत. मी हलक्या आवाजात म्हटलं. ती हलकंसं विषण्ण हसली.

ते गेले मागच्या महिन्यात.

हे शब्द माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त कटू जाणवले. ती अशुभ शंका खरी ठरली.

I am really very sorry for him. व्यथित होऊन मी म्हणालो.

ते नेहमी या जागेबद्दल बोलायचे. या कॅफेलाच जणू घर मानत ते. असं म्हणून तिने आपल्या पर्समधून एक लिफाफा काढला.

हे त्यांनी तुमच्यासाठी ठेवलं होतं.

मी थरथरणाऱ्या हातांनी तो उघडला. आत एक हस्तलिखित पत्र होतं.

त्यात लिहिलं होतं:

मुला....कॅफे मालक न म्हणता असं म्हणणं तुला कदाचित उद्धटपणाचं वाटेल. पण तुला कल्पना नाहीये....इथे मला कॉफीपेक्षा खूप काही मिळालं. घरी मी आणि माझी पत्नी आम्ही दोघंच होतो. ती गेल्यानंतर जीवनाचं जणू ओझं वाटू लागलं होतं. पण माझ्या मुलीवर भार होईल असं मला काहीही करायचं नव्हतं. तिला माझं एकटेपण जाणवू द्यायचं नव्हतं. तुझ्या कॅफेमुळे मला पुन्हा जगण्याचं एक कारण मिळालं. ती बिस्किटं, ते गार्लिक ब्रेड, ते छोटे आईसक्रीमचे कप - मला कळत होतं की हे योगायोग नव्हते. तू मला जाणून घेतलंस. माझ्या वयाच्या व्यक्तींसाठी, याहून मोठं काहीही नसतं रे. माणसांत राहण्याची माझी इच्छा तुझ्या कॅफेनं पूर्ण केली. एका वृद्ध माणसाला जगण्याचं कारण दिलंस. त्याची ही छोटीशी परतफेड म्हण हवंतर.... अरविंद...

त्या लिफाफ्यात एक छोटासा चेकही होता. रक्कम फार नव्हती... पण त्याने कॅफेमध्ये खर्च केलेल्या रकमेच्या मानाने नक्कीच थोडी जास्तच होती. पण ते महत्त्वाचं नव्हतंच मुळी.

तुमच्या संवेदनशील मनाच्या सन्मानासाठी समजा हवंतर त्याची मुलगी हळूच म्हणाली. त्यांची इच्छा होती की तुम्ही हे धन त्यांच्यासारख्या व्यक्तींना...ज्यांची इतरांनी समजून घ्यावं ही एकच अपेक्षा असेल अशांना... मदत करण्यासाठी वापरावं.

मला स्वतःला सावरायला क्षणभर वेळ लागला.

ती गेल्यावर, डोळ्यांच्या कडा पुसून मी खिडकीजवळच्या त्याच्या त्या टेबलकडे चालत गेलो - त्याचं टेबल. हो... त्याचंच टेबल....पण त्याची खुर्ची मात्र रिकामी होती. पण तरीही ती रिकामी वाटत नव्हती.

पुढच्या आठवड्यात, मी त्या खिडकीजवळ एक छोटा बोर्ड लावला : जर तुम्हाला बसायला उबदार, मायेची आणि आपुलकी वाटणारी जागा हवी असेल, तर इथे ... या खुर्चीत तुमचं स्वागत आहे. तुम्ही काही ऑर्डर द्या ही अपेक्षाही नाही. केवळ तुमचं अस्तित्व माझ्यासाठी मोलाचं आहे.

तेव्हापासून, लोकं त्या जागेसाठी येऊ लागले, तिथे बसू लागले.

नोकरी सांभाळून अभ्यास करणारा एखादा कॉलेज विद्यार्थी, आपलं विणकाम साहित्य घेऊन इथे येऊन बसणारी एखादी हौशी स्त्री, फक्त शांतता हवी असणारी एखादी व्यक्ती असे अनेक जण...

आणि जेव्हा जेव्हा प्रत्येक वेळी मी त्यांना कॉफी देतो - कधी कधी बिस्किटं , कधी छोटा केक कधी गार्लिक ब्रेड तर कधी आइस्क्रीमचा छोटा कपही- तेव्हा तेव्हा मला अरविंदची आठवण येते.....जो रोज येऊन मेनूमधली सर्वात स्वस्त गोष्ट मागवे. काहींना वाटे तो जागा अडवतोय.

पण खरंतर त्यानं मला एक साधं तत्व शिकवलं....कधी कधी आपण दुसऱ्याला देऊ शकतो अशी सर्वात अमूल्य चीज म्हणजे अन्न नाही तर एकाकी न वाटण्याची हमी....

आज मागे वळून पाहताना एक जाणवतं....कधी कधी, एखादा सर्वात शांत ग्राहकच सर्वात परिणामकारक धडा शिकवून जातो.

■ ■ ■

बुलेट ट्रेनच्या बोगद्याच्या कामाचा पहिला टप्पा पूर्ण

■ मुंबई

मुंबई- अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगात सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत नवी मुंबईत बोगद्याचे काम सुरू असून याचा आता पहिला महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. २५ किलोमीटर लांबीच्या या बोगद्याच्या कामात आता ५ किलोमीटरपर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. हे काम करण्यासाठी न्यू ऑस्ट्रिन टनेलिंग मेथड म्हणजेच एनएटीएम तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

आता बोगद्याच्या आतील भागाच्या मजबुतीकरणाच्या कामाला सुरूवात करण्यात आली आहे. हे काम टनेल बोरिंग मशिनच्या म्हणजेच टीबीएमच्या मदतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे काम वेगात सुरू आहे.

हा बुलेट ट्रेन प्रकल्प भुयारी आणि उन्नत पध्दतीने तयार केला जात आहे.

मुंबईतील जागेची कमतरता लक्षात घेऊन वांद्रे- कुर्ला संकुल ते शिळफाटादरम्यान खाडी आणि पारसिक डोंगराखालून २१ किमी लांबीच्या बोगदा काढण्यात येणार आहे. या कामातील घणसोली ते शिळफाटा हा ५ किमीचा निर्णायक टप्पा पूर्ण करण्यात आला आहे.

मुंबईत ५ वर्षांत वैद्यकीय उपचार खर्च दुपटीने वाढला

■ मुंबई

मुंबईत गेल्या ५ ते ७ वर्षांत वैद्यकीय उपचारांचा खर्च दुपटीने वाढला असून, आरोग्य महागाईत २० टक्के वार्षिक वाढ झाली आहे.महागड्या खाजगी आरोग्य सेवा, उपकरणांचे खर्च आणि वाढता विमा प्रीमियम यामुळे सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे, तर महापालिकेने आरोग्य बजेटमध्ये २२ टक्के वाढ करत पीपीपी तत्त्वावर सेवा सुधारण्यावर भर दिला आहे.

'इंटरनॅशनल रिसर्च जर्नल ऑफ मॉडर्नायझेशन इन इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी अँड सायन्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या निष्कर्षानुसार, शहरी भारतात वैद्यकीय महागाईचे आव्हान वाढत आहे.

देशात आरोग्य महागाईचा दर १४ टक्के आहे, तर मुंबईसारख्या शहरांमध्ये हा दर २० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. हे सामान्य महागाई दरापेक्षा कितीतरी जास्त असल्याने उपचारांच्या खर्चात वेगाने वाढ होत आहे. विम्याच्या आकडेवारीवरूनही हाच कल दिसून येतो. गेल्या पाच वर्षांत सामान्य आजारांसाठी रुग्णालयात दाखल होण्याचा खर्च दुप्पट झाला आहे. संसर्गजन्य रोगांच्या उपचारांचा खर्च १६ टक्क्याने वाढला आहे, तर श्वसनविकारांचा खर्च ९४ टक्क्याने वाढला आहे. संसर्गजन्य रोगांसाठी विम्याचा सरासरी दावा २०१८ मधील २६ हजार रुपयांवरुन २०२३-२४ मध्ये ६५ हजार झाला आहे. याउलट, मोतीबिंदू उपचारांमध्ये संथ वाढ दिसून आली आहे.

कमी वेळ रुग्णालयात राहावे लागत असल्याने विम्याच्या दाव्यांची रक्कम ७९ हजार रुपयांवरून १.२ लाख रुपयांपर्यंत झाला आहे.

उद्योजक मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित महापौरांच्या बैठकीत मांडल्या समस्या

■ विरार

वसई-विरार शहरातील उद्योजकांना विविध समस्या भेडसावत असून त्यावर तोडगा काढण्यासाठी महापौरांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या बैठकीत उद्योजकांनी दैनंदिन मूलभूत समस्यांचा पाढाच वाचला.

वसई-विरार शहरात मोठे औद्योगिक क्षेत्र आहे. या क्षेत्रात १५ हजारांहून अधिक छोटे-मोठे उद्योग कार्यरत आहेत. हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह या उद्योगांवर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षापासून उद्योजकांना विविध समस्या

१५ हजारांहून अधिक छोटे-मोठे उद्योग कार्यरत

भेडसावत आहे. त्यासंदर्भात शासनाकडे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यावर तोडगा काढून शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी उद्योजकांनी महापौर अजीव पाटील यांची भेट घेतली. मात्र या बैठकीत बहुतांश उद्योजकांनी रस्ते, पाणी, वीज आणि परिवहन आदी समस्या मांडल्या. या मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून दिल्यास उद्योजकांना आपला व्यवसाय अधिक सुलभतेने करता येईल असे मत शिष्टमंडळाने व्यक्त केले. यावेळी महापौरांनी शहरातील कारखानदारी वृद्धिंगत करण्याबरोबरच उद्योजकांना भेडसावणारे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महानगरपालिका सर्वतोपरी सहकार्य करेल.

जळगावात १०-१२ कुत्र्यांचा हल्ला तरुणामुळे चिमुरडा बचावला

■ जळगाव

जळगावमधील सावदा येथील ख्वाजा गरीब नवाज नगर परिसरात भटक्या सुमारे १० ते १२ कुत्र्यांनी एका चिमुरड्यावर हल्ला केला. त्याच वेळी एका तरुणाने जीवाची पर्वा न करता धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला असून संबंधित तरुणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दोन दिवसांपूर्वी या परिसरात एक लहानगा एकटा असताना भटक्या कुत्र्यांच्या टोळीने त्याच्यावर हल्ला केला. कुत्रे त्या बालकावर तुटून पडत असतानाच शेजारी असलेल्या शेख बालू शेख मुनीर याने क्षणाचाही विलंब न करता लहानग्याच्या दिशेने धाव घेत कुत्र्यांना पळवून लावले. या प्रयत्नात शेख बालू याचा पाय मुरगळून तो जखमी झाला.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्याधिकारी भूषण वर्मा तसेच आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. मुक्ताईनगर येथून विशेष श्वान पकड पथकाला पाचारण करण्यात आले.

बेस्टच्या कंत्राटी बस नादुरुस्त! मुंबईकरांची सुरक्षा धोक्यात

■ मुंबई

बेस्ट समिती सदस्य नितीन नांदगावकरांचा आरोप

बेस्टच्या कंत्राटी म्हणजेच भाडेतत्त्वावरील बसेस अत्यंत नादुरुस्त आणि धोकादायक आहेत. ही परिस्थिती बेस्टच्या अभियांत्रिकी विभागाने केलेल्या तपासणीत उघड होऊनही या बसेस तशाच रस्त्यावर धावत आहेत. त्यामुळे मुंबईकर प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आली असल्याचा आरोप उबाठा शिवसेनेचे बेस्ट समिती सदस्य नितीन नांदगावकर यांनी केला आहे. तसेच कंत्राटी बसेसचे सुरक्षा परीक्षण करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणीही नांदगावकर यांनी बेस्टच्या महाव्यवस्थापकांकडे केली आहे.

नितीन नांदगावकर यांनी म्हटले आहे की, बेस्टच्या ताफ्यातील कंत्राटी बसेस तांत्रिकदृष्ट्या अपात्र असूनही त्या रस्त्यावर चालवल्या जात आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. दोन कंत्राटदारांच्या बसेसमधील ८ आणि ५ बसेसमध्ये गंभीर दोष असल्याचे आढळले आहे. यामध्ये ब्रेक निकामी होणे, स्टिअरिंग लॉक होणे आणि ब्रेक लायनरमधील बिघाड यांचा समावेश आहे. अनेक बसेस दुरुस्त नसतानाही 'दुरुस्त' असल्याचे दाखवून पुन्हा सेवेत आणल्या जात आहेत.नादुरुस्त बसेस चालवण्यासाठी कंत्राटदारांकडून चालकांवर दबाव आणला जात आहे. तरी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. तसेच यापुढे अभियांत्रिकी विभागाच्या लेखी परवानगीशिवाय कोणतीही बस रस्त्यावर चालवू नये. नांदगावकर यांच्या या आरोपांनंतर बेस्ट प्रशासनाने तातडीने या कंत्राटी बसेसची तपासणी करण्याचे आदेश दिले असून ८ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

नागपूरमध्ये एसआरपी कर्मचाऱ्याची डॉक्टरला हेल्मेटने बेदम मारहाण

■ नागपूर

नागपूरच्या अजनी चौकात एका राज्य राखीव दल (एसआरपी) कर्मचाऱ्याने कारचालकाला हेल्मेटने बेदम मारहाण केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस दलाच्या वर्तणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

डॉ. साहिल अरोरा आपल्या कारने अजनी चौकातून जात असताना एक एसआरपी कर्मचारी दुचाकीवरून मोबाईलवर बोलत होता. याच दरम्यान त्याच्या दुचाकीची डॉक्टरांच्या कारला धडक बसली. या अपघातात कारचा आरसा तुटला. या घटनेनंतर दोघांमध्ये वाद झाला. मात्र, वाद वाढताच एसआरपी कर्मचाऱ्याने संतापाच्या भरात हेल्मेट काढून डॉक्टर साहिल अरोरा यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. भर चौकात झालेल्या या मारहाणीमुळे नागरिकांनीही संताप व्यक्त केला. हा मारहाण करणारा कर्मचारी हा राज्य राखीव दलामध्ये शिपाई असल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित दोषी कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल केला.

राज्यात संघटनात्मक बांधणीसाठी भाजपाचा १२०० शिबिरांचा धडाका

■ मुंबई

भाजपाकडून महाराष्ट्रात मोठी संघटनात्मक बांधणी करण्यासाठी व्यापक पातळीवर हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. नव्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या मूळ विचारधारेशी जोडण्यासाठी राज्यभर तब्बल १२०० प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

भाजपाने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपली संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार केला असून, या शिबिरांद्वारे कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा, कार्यपद्धती आणि संघटनात्मक कामकाज यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

२७ महिन्यांत १२८ अनधिकृत पुतळे

■ बीड

बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून महापुरुषांचे पुतळे उभारण्याची स्पर्धा लागली आहे. यामुळे प्रशासनासमोर नवे पेच निर्माण झाले आहेत. गेल्या २७ महिन्यांत जिल्ह्यात तब्बल १२८ अनधिकृत पुतळे उभारण्यात आले आहेत.

विशेषतः गेवराईतील घटनेनंतर या प्रकारात वाढ झाली असून, अनेक ठिकाणी प्रशासनाची पूर्वपरवानगी न घेता पुतळे बसवण्यात आले आहेत. केवळ दोन वर्षांच्या कालावधीत ही संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत १०९ फौजदारी गुन्हे दाखल केले असून, सुमारे ५०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाईच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. महापुरुषांच्या पुतळ्यांना आमचा विरोध नाही. मात्र, नियमानुसार समिती स्थापन करून त्यांचे संवर्धन करणे आणि त्यांच्या विचारांचे आचरण करणे अधिक महत्त्वाचे आहे असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी केले आहे.

नवी मुंबईत काळी जादूच्या नावाखाली महिलांवर अत्याचार

■ मुंबई

राज्यात भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण गाजत असतानाच आता नवी मुंबईतील कळंबोली परिसरात एका भोंदूबाबाकडून काळी जादूच्या बहाण्याने महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अब्दुल रशीद उर्फ बाबाजान असे या आरोपीचे नाव असून, या प्रकरणी दोन महिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

आरोपी बाबाजान हा लोकांना तत्त्वज्ञान आणि धार्मिक गोष्टींचा आधार देत विश्वास संपादन करायचा. आर्थिक, सामाजिक तसेच वैवाहिक समस्या दूर करण्याचे आमिष दाखवत तो लोकांना आपल्या जाळ्यात ओढत असे. विशेषतः महिलांना काळी जादूची भीती दाखवून त्यांना

भोंदूबाबा अटकेत

एकट्याने बोलावून त्यांच्यावर अत्याचार करत असल्याचा आरोप आहे. खालापूर येथील निर्जन फार्महाऊसवर महिलांना नेऊन मध्यरात्री काळी जादूच्या नावाखाली अमानुष कृत्ये केल्याचेही समोर आले आहे. विरोध केल्यास जादूटोणा करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिली जात होती. याशिवाय सांताक्रूझ येथेही एका आई-मुलीवर अत्याचार केल्याचा गुन्हा यापूर्वी दाखल असल्याची माहिती उघड झाली आहे. कळंबोली परिसरात मोठ्या प्रमाणावर लोक त्याला भेटण्यासाठी येत असल्याने स्थानिक सोसायटी सदस्यांनी त्याला घर सोडण्यास सांगितले होते. दरम्यान, गुन्हे दाखल झाल्यानंतर आरोपीने कुटुंबासह पलायन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी खालापूर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल म्हणाले की, पीडित तरुणी काही दिवसांनंतर पोलीस ठाण्यात आली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

सागरी सामर्थ्य वाढणे आवश्यकच

सध्या अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यामध्ये सुरू असलेले युद्ध त्यातून निर्माण झालेली जागतिक अस्थिरता, अशांतता आणि त्याचे भारतावर होत असलेले परिणाम या सगळ्यांचा विचार केला तर एकूणच भविष्यकाळामध्ये भारतासारख्या मोठ्या देशाला आपली सामरिक सुरक्षितता वाढवणे अत्यंत आवश्यक ठरते. सध्याच्या या परिस्थितीमध्ये भारताला स्वतःचा इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याकरता बरेच परिश्रम करावे लागत आहेत. होर्मुज या सामुद्रधुनीतून आपली जहाजं सुखरूपपणे बाहेर काढणे भारताला अधिक कष्टदायक होत आहे. भारताच्या तेल व्यापारावर त्याचा मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळते आहे. कारण आखाती देशांवरही इराणकडून हल्ले झाल्याने भारताला ज्यांच्याकडून हमखासपणे नियमितपणे सुरळीत तेल पुरवठा होतो ते देशही या युद्धाच्या कचाट्यात सापडलेले आहेत. अशा या परिस्थितीमध्ये अमेरिका, इराण, यांच्याकडून सर्व प्रकारच्या युद्ध माध्यमांचा उपयोग केला जातो आहे. मग अगदी नौदल पायदळ आणि हवाई दलाच्या माध्यमातून इराण अमेरिका एकमेकांवर हल्ले करत आहेत. इस्त्रायलकडून क्षेपणास्त्र डागली जात आहेत कोणत्याही परिस्थितीत इराणमध्ये सत्तांतर घडवून आणणे हा अमेरिकेचा उद्देश आहे तो कितपत यशस्वी होईल. हे येणाऱ्या काळात दिसेल. परंतु अशा परिस्थितीमध्ये भारताला जाणवलेली बाब ही अधिक महत्त्वपूर्ण ठरते. कारण अशा परिस्थितीत भारताला इतर जगातील इतर देशांवर अवलंबून राहणे आणि युद्धाच्या परिस्थितीमध्ये स्वतःची व्यवस्था अबाधित ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान ठरते. भविष्य काळामध्ये जागतिक परिस्थिती जरी अशांत झाली तरी सुद्धा भारताला इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही आणि स्वतःची आत्मनिर्भरताही त्यातून सिद्ध होईल याची तीव्र जाणीव या युद्धाने भारताला करून दिलेली आहे. आपण जगात अनेक मित्र तयार केले असले तरी त्याचा युद्धजन्य परिस्थितीत कितपत उपयोग होईल हे सांगता येत नाही. म्हणून अशा परिस्थितीत भारताने आपली सर्व प्रकारची शस्त्र सज्जता आणि आत्मनिर्भरता वाढवणे हा त्यावरचा प्रभावी उपाय ठरतो. या सगळ्या उपायांचा एक भाग म्हणून अलीकडेच सरकारने आपली सामरिक शस्त्रसज्जता वाढवण्यावर भर दिलेला आहे.

युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम

एकीकडे हे युद्ध सुरू असताना दुसरीकडे भारताने आपल्या नौदलाची प्रहार शक्ती अधिक बळकट केलेली आहे. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र आय एन एस आरीदमन ही स्वदेशी बनावटीची आण्विक पाणबुडी नौदलाच्या सेवेत दाखल केलेली आहे. भारताचे इतके मोठे नौदल असूनही आतापर्यंत भारताकडे पुरेशा आण्विक पाणबुड्या नव्हत्या. भारताच्या नौदलाच्या सामर्थ्यात या नव्या पाणबुडीने मोठी भर पडलेली आहे. खरे तर यापेक्षाही पाणबुडींची संख्या अधिक असायला हवी परंतु मधल्या काळामध्ये या सगळ्या आण्विक शस्त्र सामर्थ्याकडे दुर्लक्ष झाले होते. सर्वप्रथम २०१६ ला भारतीय नौदलाच्या सेवेमध्ये आयएनएस अरिहंत ही पहिली पाणबुडी दाखल झाली होती. त्यानंतर २०२४ ऑगस्टमध्ये आयएनएस अरिघात ही पाणबुडी विकसित करण्यात आली परंतु २०१६ ते २०२४ जवळ जवळ आठ वर्षानंतर तिसरी पाणबुडी दाखल करणे शक्य झाले. मात्र २०२४ नंतर केवळ दोन वर्षांमध्ये म्हणजेच २०२६ ला आता ही तिसरी अरीदमन आण्विक पाणबुडी दाखल झाल्याने भारतीय नौदलाला मोठा दिलासा मिळाला आहे. किंबहुना भारताच्या नौदल सामर्थ्यांमध्ये मोठी भर पडलेली आहे. या सगळ्या तिन्ही पाणबुड्यांची शृंखला लक्षात घेतली तर प्रत्येकामध्ये अरी हा शब्द आलेला आहे , अरी याचा अर्थ शत्रू होतो. यातून शत्रूला पराभूत करण्याचीच मानसिकता किंवा संदेश दिला गेलेला आहे. यापूर्वीच भारताने आपली हवाई आणि भूदल आण्विक सिद्धता सिद्ध केलेली होती. परंतु भविष्य काळामध्ये अचानकपणे उद्भवणारे संकट आणि आताच्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये नौदलाची क्षमता पाणबुड्यांच्या माध्यमातून अधिक सुसज्ज करणे गरजेचे वाटले होते. म्हणूनच भारताने पूर्णपणे स्वदेशी बनावटीची तिसरी आण्विक पाणबुडी आपल्या ताफ्यामध्ये समाविष्ट केलेली आहे. यामध्ये के- चार क्षेपणास्त्र वाहून नेण्याची क्षमता आहे. शत्रूच्या जहाजांवर तिच्या माध्यमातून हल्ला करता येणे शक्य होणार आहे. नौदलाची ही प्रहार क्षमता निश्चितच एकूणच देशाच्या संरक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरते. भारताला तीनही बाजूंनी समुद्राने वेढलेले आहे. किंबहुना ही भारतासाठी सर्वात मोठी सागरी संरक्षणाची नैसर्गिक संधी म्हणता येईल. तीनही बाजूने समुद्र असल्याने या सगळ्या समुद्र सीमा अधिकाधिक सुरक्षित ठेवायच्या असतील तर आधुनिक पद्धतीच्या पाणबुड्या, जहाजे भारताकडे असणे खूप गरजेचे ठरते. तिन्ही बाजूंनी समुद्र आहे आणि आता तीन आधुनिक स्वरूपाच्या पाणबुड्या भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल झालेल्या आहेत.

शत्रूवर धाक

भविष्य काळामध्ये आणखीन अशा दोन ते तीन पाणबुड्या तयार करण्याची भारताने तयारी ठेवलेली आहे. शस्त्रसज्ज असणे याचा अर्थ भारत स्वतःच्या संरक्षणासाठी समर्थ आहे असा शत्रूला त्यातून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. आज अमेरिका असेल इस्त्रायल असेल किंवा इराण सुद्धा गेले महिनाभर युद्धजन्य परिस्थितीचा सामना करत आहेत प्रत्येकाकडे ही शस्त्रसामर्थ्यता असल्यामुळेच ते एकमेकांवर हल्ले करू शकतात. भारतासारखा लोकसंख्येने आणि भूभागाने मोठा असलेला देश जर सुरक्षित करायचा असेल तर नौदला बरोबरच हवाई दल आणि भूदलाची क्षमता वाढवणेदेखील तितकेच गरजेचे ठरते. आज जगामध्ये भारत चौथ्या क्रमांकाचा सर्वाधिक शस्त्र संपन्न आणि सामर्थ्य संपन्न लष्करी देश मानला जातो. परंतु लोकसंख्येचा विचार केला तर भारत हा जगातील दुसरा मोठ्या सैन्यसंख्येचाही आणि शस्त्र संख्येच्या दृष्टीने देखील दुसऱ्या क्रमांकाचा देश होणे आवश्यक ठरते. या माध्यमातून भारताला स्वतःचे सामर्थ्य दाखवायचे असतेच परंतु आपल्या या शस्त्र संपन्नतेचा योग्य वेळी योग्य पद्धतीने उपयोग करण्याची क्षमताही टिकून राहते. ऑपरेशन सिंदूर मध्ये याच शस्त्र संपन्नतेमुळे थेट पाकिस्तानच्या हद्दीत घुसून तिथली दहशतवादी तळ नाहीसे करू शकलो . तिथल्या कोणत्याही नागरी वस्तीला धक्का न लावता अतिशय समर्पकपणे केलेले हे सर्जिकल ऑपरेशन जगाचासुद्धा कुतुहलाचा विषय ठरला होता. म्हणूनच शत्रूला आपल्या सामर्थ्यातून धाक वाटला पाहिजे आणि भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची त्याची हिंमत होता कामा नये या दृष्टीने देखील अशा प्रकारची ही शस्त्रसंपन्नता महत्त्वाची ठरते.

सुविचार — विलास कोळेकर, खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

पालकांनी मुलांना फक्त घरटे देऊ नये,
तर त्यांना आभाळ कवेत घेण्यासाठी लागणारे बळ आणि
स्वातंत्र्यही दिले पाहिजे.

पंचांग

सोमवार ६ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* चैत्र कृष्ण चतुर्थी
नक्षत्र - अनुराधा



रवी उदय- ०६-३०,
रवी अस्त- १८-५३

जन्मराशी :- ००-०१ ते २४-०० वृश्चिक

ज्योतिर्लिंग यात्रा-पाडवी, पहाटे पूर्वेला मंगळ दर्शन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** ● कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** ● Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

मशरूम राईस

★**साहित्य :**
१ कप बासमती तांदूळ (धुवून २० मिनिटे भिजवलेला), स्वच्छ धुवून तुकडे केलेले २०० ग्रॅम मशरूम, उभा चिरलेला १ मध्यम कांदा, १ टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, १/२ कप गाजर आणि मटार, १-२ हिरव्या मिरच्या, खडा मसाला (तमालपत्र, लवंग, काळी मिरी, दालचिनी), १ टीस्पून जिरे, मीठ (चवीनुसार), २-३ टेबलस्पून तेल किंवा तूप, कोथिंबीर (सजावटीसाठी)

★**कृती :** कढईत तेल किंवा तूप गरम करा. त्यात जिरे आणि खडा मसाला टाका. चिरलेला कांदा, हिरवी मिरची आणि आलं-लसूण पेस्ट घालून कांदा सोनेरी होईपर्यंत परता. आता मशरूम आणि गाजर-मटार टाकून मशरूममधून पाणी सुटेपर्यंत ५-६ मिनिटे परता. त्यानंतर भिजवलेला तांदूळ टाकून हलक्या हाताने परता.

२ कप गरम पाणी आणि चवीनुसार मीठ घाला. झाकण ठेवून मंद आचेवर १०-१२ मिनिटे किंवा तांदूळ शिजेपर्यंत वाफ काढा.

५ मिनिटाने खायला तयार मशरूम राईसवर बारीक चिरलेली कोथिंबीर पेरा.

गरम मशरूम राईस रायता किंवा सलाडसोबत सर्व्ह करा.

लखनौ सुपर जायंट्सने विजयाचे खाते उघडले

पंतच्या नाबाद ६८ धावांमुळे हैदराबाद पराभूत

कर्णधार ऋषभ पंतने नाबाद ६८ धावांच्या निर्णायक खेळीमुळे लखनौ सुपर जायंट्सने सनरायझर्स हैदराबादचा ५ गडी राखून पराभव केला. हा हैदराबादचा दुसरा पराभव आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर आज शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या आयपीएलच्या १० व्या सामन्यात हैदराबादने ९ बाद १५६ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात लखनौने १९.५ षटकांत ५ बाद १६० धावा करुन या हंगामातील विजयाचे खाते उघडले. ४ षटकांत ९ धावा देऊन २ गडी टिपणारा लखनौचा गोलंदाज मोहम्मद शमी सामनावीर ठरला.

■ हैदराबाद

लखनौने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा हा निर्णय मोहम्मद शमीने योग्य ठरवला. कारण त्याने हैदराबादचा धडाकेबाज सलामीवीर अभिषेक शर्मा (०) आणि ट्रॅव्हिस हेड (०) यांना स्वस्तात बाद केले. त्यामुळे सुरुवातीलाच हैदराबादचा डाव अडचणीत आला असताना कर्णधार ईशान किशन १ धाव काढून माघारी परतला. मग लियाम लिव्हिंगस्टोन १४ धावांवर बाद झाल्यामुळे हैदराबादची अवस्था ७.१ षटकांत ४ बाद २६ धावा अशी झाली होती. अशा नाजूक स्थितीत हेनरिक क्लासेन व नितीश कुमार रेड्डी यांनी संयमी खेळी करून ११६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. मात्र संघाची धावसंख्या १७.३ षटकांत ४ बाद १४२ वर पोहोचताच रेड्डी ५६ धावांवर बाद झाला. मग त्यापाठोपाठ क्लासेनही ६२ धावा करुन तंबूत परतला. हर्ष दुबेने ०, शिवांग कुमारने ५, हर्षल पटेलने ४ व अनिकेत वर्माने नाबाद २ धावा केल्या. परिणामी हैदराबादने निर्धारित षटकात ९ बाद १५६ धावांपर्यंत मजल मारली.

प्रत्युत्तरात लखनौचे सलामीवीर एडेन मार्करम आणि मिचेल मार्श यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. तेवढ्यात मार्श १४ धावा करत इशान मलिंगाचा शिकार झाला. त्यानंतर मार्करमने पंतसोबत दुसऱ्या विकेटसाठी ४० धावांची भागीदारी केली. मार्करम २७ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह ४५ धावा करुन बाद झाला. आयुष बडोनी (१२), निकोलस पूरन (१) हे झटपट बाद झाले. मात्र पंतने संघाचा डाव सांभाळला. संघाला विजयासाठी शेवटच्या षटकात ९ धावांची आवश्यकता असताना पंतने ३ चौकार ठोकले. त्यामुळे हैदराबादला ५ विकेटने पराभूत केले.

कोलकातासमोर आज पंजाब किंग्जचे आव्हान

■ कोलकाता

कोलकाता येथील ईडन गार्डनवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या १२ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्ससमोर फॉर्मात असलेल्या पंजाब किंग्ज संघाचे मोठे आव्हान असणार आहेत. पंजाब किंग्ज विजयाची हॅटट्रिक साधण्याच्या प्रयत्नात असेल आणि तीन वेळेचा विजेता असलेल्या कोलकात्याचा संघ सलग तिसरा पराभव टाळण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यासोबत कोलकात्याचा कर्णधार अजिंक्य रहाणेच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चेन्नई सुपर किंग्सचा सलग तिसरा पराभव

■ बंगळुरु

बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या ११ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून चेन्नई सुपर किंग्सला ४३ धावांनी पुन्हा लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. चेन्नईचा हा सलग तिसरा पराभव आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बंगळुरुने टिम डेव्हिडच्या ७० धावांच्या धडाकेबाज खेळीच्या बळावर चेन्नईला विजयासाठी २५० धावांचे भलेमोठे आव्हान दिले होते. मात्र हे आव्हान चेन्नईच्या संघाला पेलवले नाही आणि संघ सर्वबाद २०७ धावांवर गारद झाल्यामुळे बंगळुरुने सलग दुसरा विजय मिळवला. या विजयासह बंगळुरुने आयपीएलच्या गुणतालिकेत ४ गुणांसह अव्वल स्थानावर झेप घेतली.

२५० धावसंख्येचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात अतिशय खराब झाली. चेन्नईचे ३ गडी २.५ षटकांत ३० धावांवर बाद झाल्याने डाव संकटात सापडला होता. मात्र सरफराज खान २५ चेंडूंत ५० धावा करुन बाद झाला. कार्तिक शर्मा ६ धावांवर व शिवम दुबे १८ धावांवर माघारी परतला. प्रशांत वीर (४३) व जेमी ओव्हरटन या जोडीने फटकेबाजी केली. प्रशांत वीर बाद झाल्यानंतर जेमी ओव्हरटन (३७) षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. उर्वरित फलंदाजांना फारसे काही करता आले नाही, त्यामुळे चेन्नईला सर्वबाद २०७ धावा करता आल्याने बंगळुरुचा ४३ धावांनी सलग दुसरा विजय झाला.

नवरत्न मंडळ, एसआयईएस संघ टागोर नगर चषकाचे मानकरी

■ मुंबई

विक्रोळी पूर्व येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानातील मॅटवर टागोर नगर मित्र मंडळातर्फे झालेल्या कबड्डी स्पर्धेतील पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात विक्रोळीच्या नवरत्न मंडळाने चेंबूर क्रीडा केंद्रावर २७-२१ असा विजय मिळवून टागोर नगर चषक पटकाविला. महिला गटात हा मान कुर्ल्याच्या एसआयईएस मिळविला. या संघाने नवरत्नचा रोहन शेडगे पुरुष गटात आणि एआयईएसची आस्था सिंग महिला गटात सर्वोत्तम खेळाडू ठरले.

सुरुवातीपासून चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पहिल्या डावात १३-१० अशी नवरत्न मंडळाकडे आघाडी होती. दुसऱ्या डावात त्याच संयमाने खेळ करुन ७ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. रोहन शेडगे, गौरव पाटील, ओमकार तांबे यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. चेंबूरच्या चिराग पाटील, ओमान तोमर, कुणाल पवार यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी पडला.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार बिनविरोध

पुणे - महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची आज बिनविरोध निवड जाहीर झाली. त्यांच्या रुपात पहिल्यांदाच अध्यक्षपदी महिला विराजमान झाल्या आहेत. पुण्याच्या बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये ५ एप्रिलला पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली.

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)

एसबीआय मॅक्वेरी इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टी प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

१.	कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव	एसबीआय मॅक्वेरी इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टी प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक	दि. ०५.१०.२००९
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक, मुंबई।
४.	कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U93093MH2009PTC196222
५.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	९२, लेव्हल ९, २ नॉर्थ ॲव्हेन्यू, मॅक्सर मॅक्सिटी, वांद्रे कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र, भारत ४०००५१
६.	कॉर्पोरेट व्यक्तीचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक	दि. ०१ एप्रिल, २०२६
७.	परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक	श्री. प्रणव जे. दमानिया IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164 पत्ताः ४०७, संजर एन्क्लेव्ह, मिलाप सिनेमासमोर, एस. व्ही. रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई - ४०००६७. ईमेलः pranav@winadvisors.co.in संपर्क क्र.: +९१ ९८२०४ ६९८२५
८.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. ०१ मे, २०२६

याद्वारे सूचना देण्यात येते की, **एसबीआय मॅक्वेरी इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टी प्रायव्हेट लिमिटेडने दि. ०१ एप्रिल, २०२६** रोजी ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया सुरू केली आहे.
एसबीआय मॅक्वेरी इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टी प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे **दि. ०१ मे, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको (जर असल्यास), यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारक त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
प्रणव दमानिया
एसबीआय मॅक्वेरी इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्टी
प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रकरणामध्ये परिसमापक
नोंद क्र.: IBBI/IPA-001/IP-P00079/2017-18/10164
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता ("एएफए"): AA1/10164/02/300627/109139
दिनांकः ०६.०४.२०२६ एएफए वैधताः दि. ३० जून, २०२७
ठिकाणः मुंबई

purple FINANCE
कार्यालय: पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१. **दूरध्वनी:** ०२२-६९१६५१२३, **वेबसाइट:** www.purplefinance.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, **पर्पल फायनान्स लिमिटेड (पीएफएल)** चे अधिकृत अधिकारी म्हणून, अधोस्वाक्षरीकृत व्यक्तीने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *(कायदा), २००२ (५४/२००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३(१२) सहवाचिता नियम ९ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज ही सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी **मागणी सूचना** जारी केली. कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरीकर्त्याने सदर नियमांच्या नियम ९ सहवाचिता सदर *(कायदा) च्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक** ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी पर्पल फायनान्स लिमिटेडकडून संबंधित प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे शुल्क आकारले जाईल:

अ. क्र.	कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा	ज्या प्रतिभूत मालमत्तेवर स्वारस्य निर्माण झाले आहे त्या मालमत्तेचे वर्णन	पाठवलेली मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम	सांकेतिक ताबा दिनांक
१	१. रणजीत मुकुंद शेलावळे (कर्जदार) २. वंदना रणजीत शेलावळे (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलकेएएल ०००००६७२ **शाखा :** कल्याण	ग्रामपंचायत घर क्र.३४६, मोजमाप १२७१ चौ. फू., गावठाण जमिनीवर वसलेले, आणि गाव- भदाणे, तालुका - मुरबाड व जिल्हा ठाणे, महाराष्ट्र - ४२१४०१ येथे स्थित, **चतुसिमा: पूर्व-** श्री. गोविंद आंबो शेलावळे, **पश्चिम-** श्री. वसंत गणपत शेलावळे, **दक्षिण-** श्री. गोविंद नागो शेलावळे, **उत्तर-** श्री. वसंत गणपत शेलावळे.	१२.०१.२०२६ आणि रू. ४५७२०५/-	०३.०४. २०२६
२	१. निर्मला प्रभाकर वाघे (कर्जदार) २. दादू दौलत वाघ (सह-कर्जदार) ३. विमल दादू वाघ (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलकेएएल ०००१४२० **शाखा :** कल्याण	घर क्र.५१९, ७२५ चौ.फूट., खंडोबा मंदिरजवळ, सावरपाडा येथे, पोस्ट साकुर्ली, शहापूर, जिल्हा ठाणे ग्रामपंचायत साकुर्ली, तालुका शहापूर व जिल्हा - ठाणे - ४२१६०१ हद्दीतील गावठाण जमिनीवर बांधकामित, **चतुसिमा: पूर्व-** श्री.सुनील राजेश मुकणे **पश्चिम-** श्री. शिवाजी वाघ, **दक्षिण-** श्रीमती आशा वाघ, **उत्तर-** श्री संजय.	१२.०१.२०२६ आणि रू. ३७४४९१/-	०३.०४. २०२६
३	१. उषा विजय जगळे (कर्जदार) २. विजय सोमा जगळे (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलकेएएल ०००१६९६ **शाखा :** कल्याण	घर क्र.५४४, मोजमाप सुमारे ७२० चौ.फूट, जे आवळ, तालुका शहापूर व जिल्हा ठाणे, महाराष्ट्र - ४२१६०१ येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आवळे गावात वसलेले आहे. **चतुसिमा: पूर्व-** बाळू पांडुरंग जाधव, **पश्चिम-** भास्कर लक्ष्मण अंदाडे, **दक्षिण-** रत्ना राजेश जंगले, **उत्तर-** भावना बबन कांगळे.	१२.०१.२०२६ आणि रू. २७६०५५/-	०३.०४. २०२६

दिनांक: ०६.०४.२०२६, ठिकाण: ठाणे **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

सुख शांती समाधान

हातावरील रेषा सांगते विवाह योग

प्रत्येकाला आपल्या आयुष्यात पुढे काय होणार आहे याची काळजी असते किंवा जीवनात काही अडचणी येत असतील लोक ज्योतिषाला आपली कुंडली दाखवतात आणि त्यानुसार उपाय करतात. काही ज्योतिष पत्रिका पाहून सांगतात तर काही हस्तरेषा पाहून सांगतात. आज आपण हातावरील त्या रेषेबद्दल बोलणार आहोत ज्यामुळे आपल्याला लग्नाशी संबंधित महत्त्वाची माहिती मिळू शकते. आपल्या तळहातावर एक विवाह रेषा आहे, ज्याच्या मदतीने आपण जाणून घेऊ शकतो की लग्नानंतर कसे असू शकेल? एवढंच नाही तर कुणाच्या नशिबात दोन लग्नं होण्याची शक्यता असेल तर त्याचा इशाराही हातात सापडतो. ते कसे शोधता येईल ते जाणून घेऊ या...

विवाह रेषा - हातावरील विवाह रेषा सर्वात लहान बोटाच्या अगदी खाली आहे. हे हृदय रेषेच्या अगदी वर आणि बुध पर्वताजवळ स्थित आहे. बुध पर्वतावर बाहेरून आतून जी रेषा येते तिला विवाह रेषा म्हणतात.

या ओळीवरून हे कळू शकते की कोणाचे लग्न त्याच्या आवडीनुसार होईल की ते ठरवले जाईल. लग्न कसे होईल हे त्याच्या प्लेसमेंटवरून कळू शकते. याशिवाय या ओळीतून दोन विवाहांचाही संकेत मिळतो. हातावर एकापेक्षा जास्त विवाह रेषा आहेत की नाही हे कसे जाणून घ्यायचे आणि फक्त त्या रेषेचा विचार केला जाईल जी स्पष्ट असेल. उरलेल्या छोट्या ओळी जुन्या नातेसंबंधाच्या तुटण्याचे संकेत देतात. बऱ्याच विवाहाच्या ओळींचा अर्थ असा आहे की एकतर व्यक्ती घटस्फोट घेईल किंवा तो नातेसंबंधात प्रामाणिक राहणार नाही. जर दोन विवाह रेषा असतील आणि एक गडद असेल. जर यापैकी एक रेषा बुध पर्वतापर्यंत विकसित होत असेल तर अशा व्यक्तीचे दोन विवाह होतात. दुसरीकडे, जर ही रेषा वरच्या दिशेने जाते आणि हृदय रेषेला मिळते, तर अशा लोकांना त्यांच्या वैवाहिक जीवनात अडचणी येतात. त्याच वेळी, जर एखाद्याच्या तळहातावर या रेषेवर क्रॉस चिन्ह असेल तर अशा लोकांच्या विवाहात अनेक प्रकारचे अडथळे येतात.

दुकानात भरभराट होण्यासाठी हे करा...

प्रत्येक व्यवसायात यश मिळतेच असे नाही. दुकानदार आपला व्यवसाय वाढावा, भरभराट व्हावी यासाठी अनेक उपाय करत असतात. परंतु काही गोष्टी अशा असतात की त्या आपल्या समोर असतात पण आपल्याला कळून येत नाही. वास्तुशास्त्रानुसार जर दुकानाबाहेर किंवा दुकानासमोर काही चुकीच्या गोष्टी असतील तर आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे दुकान खरेदी करताना हे वास्तुनियम अवश्य तपासून घ्या.

व्यापारी आपला व्यवसाय चांगला चालण्यासाठी किंवा भरभराट होण्यासाठी ज्योतिषीय उपाय किंवा अनेक उपाय करतात. आपण अनेकदा पाहतो काही दुकाने किंवा हॉटेल्समध्ये कॅश काउंटरजवळ देवी लक्ष्मी कुबेर यांची प्रतिमा किंवा यंत्र ठेवलेले असते. तर काहीजण पाण्यात कासव ठेवतात. तसेच काचेच्या पाण्यात लिंबू टाकून ठेवले जाते यामुळे नकारात्मकता दूर होते व व्यवसायात भरभराट होते असे मानतात. मात्र वास्तुशास्त्रात काही नियम सांगितले आहेत ज्यानुसार तुमच्या दुकानासमोर जर काही वस्तू किंवा चुकीच्या गोष्टी असतील तर लक्ष्मी कधीच तुमच्या दुकानात प्रवेश करणार नाही असे सांगितले जाते. त्यामुळे धंदा मंदावतो आर्थिक नुकसान होऊ लागते. या गोष्टी टाळण्यासाठी पाहुयात दुकानासंदर्भातील वास्तुनियम काय आहेत. दुकानासमोर कचरापेटी नसावी : तुमच्या दुकानासमोर किंवा हॉटेल समोर कधीची केर कचरा किंवा डस्टबिन ठेवू नये. तुम्ही जर कचरापेटी बरोबर दुकानासमोर ठेवली तर लक्ष्मी कधीच तुमच्या दुकानात पाऊल ठेवणार नाही कारण देवी लक्ष्मीला स्वच्छता, सुगंध यागोष्टी प्रिय आहेत. जर लक्ष्मी नाराज झाली तर तुमच्या व्यवसायाला गळती लागली म्हणून समजा. त्यामुळे कचरापेटी दुकानासमोर असू नये. दुकानासमोर खांब किंवा भिंत नसावी : दुकानाच्या वास्तुशास्त्र नियमानुसार दुकाना समोर कोणत्याही प्रकारचा अडथळा नसावा. याचा अर्थ दुकानाच्या दरवाजासमोर खुली जागा असावी कोणतीही भिंत किंवा लोखंडी खांब विजेचे खांब किंवा होर्डिंग लावलेले भले मोठे खांब अथवा पोस्टर दुकानासमोर नसावे.

या ५ गोष्टी स्वयंपाकघरात ठेवू नका!

वास्तुशास्त्र आणि पारंपरिक मान्यतेनुसार, स्वयंपाकघर हे फक्त स्वयंपाक करण्याचे ठिकाण नाही, तर ते आरोग्य, समृद्धी आणि घरातील लक्ष्मीचे स्थान मानले जाते. अशा परिस्थितीत येथे वास्तुनुसार वस्तू ठेवाव्यात. स्वयंपाकघरात चुकीच्या किंवा निरुपयोगी वस्तू ठेवल्या गेल्यास नकारात्मक ऊर्जा वाढते आणि धन आणि आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे स्वयंपाकघर स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तुमच्या स्वयंपाकघरात निरुपयोगी, तुटलेल्या किंवा न वापरलेल्या वस्तू असतील तर त्या ताबडतोब काढून टाका.

जळलेला तवा, तुटलेले तवा किंवा तडकलेले भांडे स्वयंपाकघरात ठेवले तर ते चांगले मानले जात नाही. यामुळे घरामध्ये नकारात्मकता वाढते आणि आर्थिक समस्या उद्भवू शकतात. याशिवाय घरात तणाव आणि भांडणेही वाढू शकतात. तेच तेल पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. तसेच वास्तुनुसार यामुळे नकारात्मक ऊर्जा वाढते. यामुळे घरातील वातावरण बिघडू शकते आणि खर्चही वाढू शकतो.

कालबाह्य झालेल्या किंवा खराब झालेल्या वस्तू स्वयंपाकघरात ठेवल्या तर ते घरातील ऊर्जा स्थिर होण्याचे लक्षण आहे. यामुळे आर्थिक समस्या आणि अस्वच्छता वाढू शकते. म्हणून, वेळोवेळी स्वयंपाकघर स्वच्छ करणे आणि निरुपयोगी गोष्टी काढून टाकणे महत्वाचे आहे.

स्वयंपाकघर हे अत्यंत पवित्र स्थान मानले जाते. येथे झाडू किंवा घाणेरडा मॉप ठेवणे अशुभ मानले जाते. यामुळे देवी लक्ष्मीचा कोप होऊ शकतो आणि घरात आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात.

जेवणाशिवाय इतर वस्तू जसे की औषधे, बिल किंवा कागदपत्रे स्वयंपाकघरात ठेवणे योग्य मानले जात नाही. यामुळे गोंधळ वाढतो आणि त्याचा नकारात्मक परिणाम होतो. स्वयंपाकघर नेहमी स्वच्छ, साधे आणि व्यवस्थित ठेवा. फक्त खाण्यापिण्याशी संबंधित गोष्टी ठेवा. असे केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा राहते आणि सुख-समृद्धी येते.

दिवा लावताना कोणती वात वापरावी?

हिंदू धर्मात प्रत्येक शुभ कार्यात आणि दैनंदिन पूजेत दिवा प्रज्वलित करण्याचे विशेष महत्त्व आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा हा दिवा केवळ घराला प्रकाशमान करत नाही, तर आपल्या जीवनातील नकारात्मकताही दूर करतो. मात्र, पूजेत आपण कोणती वात वापरतो लांब की गोल यावर मिळणारे फळ अवलंबून असते. शास्त्रानुसार या दोन्ही वातींचे महत्त्व आणि परिणाम वेगवेगळे आहेत.

लांब वातीचा दिवा: लांब वातीचा दिवा प्रज्वलित करणे हे प्रगती आणि वाढीचे प्रतीक मानले जाते. शास्त्रांनुसार, लक्ष्मी माता, सरस्वती माता, दुर्गा माता यांसारख्या देवींची पूजा करताना नेहमी लांब वातीचा दिवा लावावा. तसेच कुलदेवतेच्या पूजेतही लांब वात वापरणे शुभ असते. असे मानले जाते की लांब वातीचा दिवा लावल्याने घरात लक्ष्मीचा कायमस्वरूपी वास राहतो आणि आर्थिक चणचण दूर होते. समाजात मान-सन्मान आणि यश मिळवण्यासाठी लांब वात अत्यंत प्रभावी मानली जाते. दक्षिण दिशेला तोंड करून पितरांच्या नावाने लांब वातीचा दिवा लावल्याने पितृदोष दूर होतो आणि पूर्वजांचा आशीर्वाद लाभतो अशी मान्यता आहे.

गोल वातीचा दिवा: गोल वात किंवा 'फूल वात' ही स्थिरता आणि सात्विकतेचे प्रतीक आहे. ब्रह्मा, विष्णू, महादेव, इंद्रदेव किंवा इतर कोणत्याही देवतेच्या पूजेसाठी गोल वातीचा दिवा वापरला जातो. तसेच कोणत्याही मंदिरात किंवा तुळशीसमोर दिवा लावताना गोल वात वापरणे अधिक योग्य मानले जाते. गोल वातीचा दिवा लावल्याने मनातील अस्थिरता दूर होते आणि घरात शांतीचे वातावरण निर्माण होते. देवाप्रती तुमची भक्ती वाढवण्यासाठी आणि एकाग्रतेसाठी गोल वात मदत करते. काही लोक चुकून कोणत्याही देवासमोर कोणतीही वात लावतात, मात्र शास्त्रात त्याबद्दल स्पष्ट नियम आहेत. लक्ष्मी किंवा कुलदेवीसमोर गोल वात लावल्याने घराची प्रगती खुंटू शकते, असे मानले जाते. त्यामुळे तिथे प्रगतीसाठी लांब वात वापरा. पितरांच्या नावाने कधीही गोल वात लावू नका, यामुळे घरात अडथळे येऊ शकतात. तिथे नेहमी लांब वातच असावी.

टीप- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

मच्छिमारांच्या डिझेल दरात प्रति लिटर तब्बल २२ रुपये वाढ

केंद्राचा दरकपातीस नकार

■ मुरुड

कोकण किनारपट्टीवर मच्छिमारांना मिळणाऱ्या डिझेल दरात प्रति लिटर तब्बल २२ रुपयांची वाढ झाल्याने मच्छिमारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दुसरीकडे युद्ध परिस्थितीमुळे सध्या तरी इंधन दरात कपात करणे शक्य नसल्याचे केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी मच्छिमारांच्या शिष्टमंडळाला सांगितले आहे.

सध्या नागरिकांच्या सर्वसामान्य पेट्रोल पंपावर डिझेल सुमारे ९२ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध आहे. परंतु मच्छिमारांना 'बल्क कॅटेगरी'तून ११४ रुपये प्रति लिटर दराने डिझेल घ्यावे लागत आहे. त्यामुळे खर्चात मोठी वाढ झाली असून उत्पन्न घटल्याने मच्छीमार दुहेरी संकटात सापडले आहेत.मच्छिमार संघटनांचे म्हणणे आहे की, सहकारी संस्थांमध्ये समावेश असलेल्या मच्छिमारांना 'बल्क ग्राहक' श्रेणीत ठेवणे अन्यायकारक आहे. त्यांना या श्रेणीतून वगळून सवलतीच्या दरात डिझेल द्यावे. सरकारकडून कोणताही ठोस दिलासा मिळाला नाही. त्यामुळे तातडीने अनुदान, सवलतीचे डिझेल किंवा आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी राज्य मच्छीमार संघटनेचे माजी अध्यक्ष विजय गिदी यांनी केली आहे. डिझेल दरवाढीमुळे सध्या केवळ १० टक्के मच्छिमारच समुद्रात उतरत असल्याचे सांगितले जात आहे. डिझेल दरवाढीमुळे उर्वरित दोन महिन्यांचा मासेमारी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे.

ठाणे जेलमध्ये कैद्याचा पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला

■ ठाणे

ठाणे मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याने पोलीस कर्मचाऱ्याच्या कानशिलात लगावली.

या मारहाणीत संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला दुखापत झाल्याची माहिती आहे. तसेच, हल्ला करताना कैद्याने पोलीस कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिताच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेनगर पोलीस ठाणे करत आहे.

भंडाऱ्यात रस्ते कामात सिमेंटऐवजी राख! उबाठाचा आरोप

■ भंडारा

भंडाऱ्याच्या लाखांदूर तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या ३३४ कोटी रुपयांच्या रस्ते बांधकामावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. कराडला-ढोलसर, मांडळ-बोथली आणि मांडळ-सरांडी या रस्त्यांसाठी मोठा निधी मंजूर झाला असूनही कामाचा दर्जा खालावल्याची तक्रार आहे. उबठाचे तालुकाप्रमुख विनोद ढोरे यांनी प्रत्यक्ष पाहणी करत, सिमेंटऐवजी कोळशाची राख आणि गिट्टीऐवजी वाळूमिश्रित चुरा वापरला जात असल्याचा आरोप केला. त्यांनी या कामाचा पंचनामा करून कंत्राटदारावर कारवाईची मागणी केली आहे.

उपविभागीय अभियंता विजया सावरकर यांनी आरोप फेटाळले आहेत. ते म्हणाले की, रस्ता बांधकामाच्या कामात कुठलीही अनियमितता नसून अंदाजपत्रक नुसारच काम योग्य पद्धतीने होत आहे.

मुंबई पालिका १३,५०० कचरापेट्या खरेदी करणार! निर्णय वादात

■ मुंबई

मुंबई महानगरपालिका कडून १३,५०० नवीन कचरापेट्या खरेदी करण्याचा निर्णय सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एकीकडे शहरातील रस्त्यांवरील सार्वजनिक कचरापेट्यांची संख्या कमी करण्याची प्रक्रिया सुरू असताना, नव्याने इतक्या मोठ्या प्रमाणावर कचरापेट्या खरेदी करण्याचा निर्णय घेतल्याने त्यावर प्रश्न उपस्थित होत आहे.

महापालिकेकडून २४० लिटर क्षमतेच्या कचरापेट्या खरेदी करण्याचे नियोजन आहे. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, शाळा, रुग्णालये आणि विविध कार्यालयांकडून कचरापेट्यांची वाढती मागणी होत आहे. त्यामुळे ही खरेदी आवश्यक आहे. तसेच, कॉम्पॅक्टर प्रणालीद्वारे कचरा उचल सुलभ होणार असल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, या खरेदीसाठी झालेल्या निविदेत प्राइमा प्लास्टिक्स या कंपनीची निवड करण्यात आली असून, सुमारे ३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर या खरेदी प्रक्रियेला वेग मिळणार आहे. मात्र, एकीकडे कचरापेट्या कमी करण्याचा निर्णय आणि दुसरीकडे नव्याने मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जात असल्याने या धोरणातील विसंगतीवरून पालिकेवर टीका होत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
ता. राहाता जिल्हा अहिल्यानगर (महा.) पिन - ४२३१०९
फोन नं. ०२४२३-२५८५०० संकेतस्थळ: **www.sai.org.in**

श्री साईबाबा संस्थान संचालित साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रुग्णालयासाठी खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत

SAIBABA HOSPITAL

Sr. No.	Name of Post	No. of post		Sr. No.	Name of Post	No. of post
1	Neurologists	2		6	Paedatricians	2 For Sainath
2	Neurosurgeons	1		7	Junior Anesthesiologists	5
3	ENT Surgeons	2 For Sainath		8	Casualty Medical Officer (C.M.O.)	6
4	Senior Anesthesiologists	2		9	Resident Medical Officer (R.M.O.)	14
5	Orthopedic Surgeons	1 For Sainath				
SAINATH HOSPITAL						
1	Medical Officer (Sonologist)	1		2	Casualty Medical Officer (C.M.O.)	1

सूचना
- वरील सर्व पदे ही ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात येतील. या पदांवरील नियुक्ती जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा नियमित उमेदवारांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच असेल याची नोंद घ्यावी.
- उमेदवारांस संस्थान संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मसुद्याप्रमाणे अर्ज करावा.
- उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत शैक्षणिक व अनुभवाचे मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे घेऊन यावे. सदर कागदपत्रे मुलाखतीचे वेळी तपासण्यात येतील.
- उमेदवारांची निवड ही संस्थानचे संकेतस्थळावर **(www.sai.org.in)** नमुद केलेल्या गुण तालिकेच्या आधारे करणेत येईल.
- कोणत्याही पदासाठी उमेदवार कमी असतील व अनुभव जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे नसल्यास सदर पदासाठी उपस्थित उमेदवारांकरीता निकष व अनुभव शिथील करण्यात येऊन त्याखालील वेतनश्रेणी / ग्रेड पे (एकत्रित वेतन) देणेत येईल.
- नियुक्त केलेल्या उमेदवाराला रुग्णालयाचे गरजेनुसार कोणत्याही रुग्णालयात काम करावे लागेल.
- वेतन, प्रोत्साहन भत्ता, पात्रता, अनुभव, वय व इतर आवश्यक सविस्तर माहितीकरीता संस्थानचे संकेतस्थळ **www.sai.org.in** ला भेट द्यावी.
- सर्व कागदपत्रांसह अर्ज **दि.२२/०४/२०२६** रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत संस्थानचे आवक विभागाकडे जमा करावेत. उशिराने प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सही/-
गोरक्ष गाडीलकर, भा. प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

क्रमांक : आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी ३९

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)
बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. १९२, मुंबई - ४००००१.

निविदा सूचना

महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम, यांच्या वतीने, स्थापत्य कामासाठी ऑनलाइन निविदा दोन बोली प्रणालींमध्ये (म्हणजे तांत्रिक बोली आणि आर्थिक बोली) इतर शासकीय आणि निमशासकीय संस्थांचा आवश्यक अनुभव असलेल्या / संबंधित वर्ग आणि श्रेणीमध्ये नोंदणी असलेल्या पात्र कंत्राटदारांकडून, मागविण्यात येत आहेत.

निविदा जाहिरातीची तारीख : ०६.०४.२०२६

टिप : अधिक माहितीसाठी कृपया आमच्या वेबसाइट **https://www.bestundertaking.com** किंवा **https://mahatenders.gov.in** ला भेट द्या

जसंअ/मु.अ. (स्था)/१३७/२०२६ महाव्यवस्थापक

सिडको शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना

पुष्पक नगर, नवी मुंबई मध्ये एसबीआर (सी-टेक) तंत्रज्ञानावर आधारित २२.५ एमएलडी क्षमतेच्या (फेज -I) उच्च मलनिःसारण प्रक्रिया संयंत्र (एसटीपी)चे सर्वसमावेशक प्रचालन आणि देखभाल

महाराष्ट्राची सिडको मर्यादीत खाली नमूद केलेल्या कामाकरिता सिडको मर्या. किंवा केंद्र शासन, किंवा महाराष्ट्र राज्य शासन आणि त्यांच्या उपक्रमांमध्ये उचित वर्ग आणि श्रेणीमध्ये नोंदणीकृत असलेल्या, अनिवार्य पात्रता निकष पूर्ण करीत असलेल्या, ज्यांनी किमान १५ एमएलडी आणि त्यावरील क्षमतेच्या एसटीपीचे प्रचालन आणि देखभाल यांसारखी तत्सम स्वरुपाची कामे पूर्ण केली आहेत आणि मलनिःसारण प्रक्रिया प्रचालनाशी सुपरिचित अशा संभाव्य बोलीदारांच्या प्रचलनामधून ई-निविदा प्रक्रियेद्वारे **"ऑनलाईन" बाब दर शतमान बोली** मागवित आहेतः

१) कामाचे नावः पुष्पक नगर, नवी मुंबई मध्ये एसबीआर (सी-टेक) तंत्रज्ञानावर आधारित २२.५ एमएलडी क्षमतेच्या (फेज -I) उच्च मलनिःसारण प्रक्रिया संयंत्र (एसटीपी)चे सर्वसमावेशक प्रचालन आणि देखभाल २) सी. ए. क्र.: ०५/सिडको/ईई(मलनिःसारण प्रकल्प)/२०२५-२६. **३) बोलीस लावण्यात आलेली किंमतः** रु. ७८,६२,५६८.९७/- (जीएसटी वगळता) (रु. ५५,४३,१११.५२ बोलीयोग्य भाग + रु. २३,१९,४५७.४५ ना-बोलीयोग्य भाग) **४) ई.एम.डी.:** रु. ७९,०००/- **५) नोंदणीकरण वर्गः** वर्ग - IV ए आणि त्यावरील (स्थापत्य) **६) पूर्तता कालावधीः** ३६५ (तीनशे पासष्ट) दिवस म्हणजेच १२(बारा) महिने पावसाळा समाविष्ट **७. निविदा प्रक्रिया शुल्कः** रु. ५,९००.०० (१८% जीएसटी समाविष्ट (ना-परतावा))

बोली कार्यक्रमासह बोली प्रपत्रे दि. ०७.०४.२०२६ रोजी १७.०१ वाजेपासून वेबसाईट **http://mahatenders.gov.in** वर उपलब्ध होतील.

अधीक्षकीय अभियंता
(मलनिःसारण प्रकल्प)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/००२/२०२६-२७

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
E-TENDER NOTICE

Sealed and superscripted tender offers are invited online from registered contractor/Companies etc. Turnkey Contract for load enhancement from 800KW/1000KVA to 3200KW/4000KVA in R/o HT Connection M/s. Chief General Manager, Chandrapur Area WCL, at Bhatadi, Chandrapur Consumer No. 450019002115, Sub-Dn:- Chd-III, Division-Chandrapur under 100% DDF Scheme (2025-26).through E-Tendering **for tender having total estimated amount of Rs 470.62 Lakhs Excluding GST. The details of tender & other relevant details of E-Tender No. SE/CH/O&M/Circle/ *Turnkey Tender/26-27/DDF-(100%)/T-01* are available from Dt. 06/04/2026 at our website www.mahadiscom.in. The last date of submission is Dt. 13/04/2026 upto 17:00 hrs. Any change in version / Corrigendum of Tender will be published on our website hereafter. Contact person:- The Executive Engineer (Adm) M. No. 7875761008.**
HO PR No.81/2026

Superintending Engineer, O&M Circle MSEDCL, Chandrapur.

ठाणे महानगरपालिका, ठाणे
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील गटार बांधणे या लेखाशिर्षकांतर्गत नौपाडा कोपरी प्रभाग समिती प्रभाग क्रमांक २० (ब) मधील खालील नमुद एकुण (०२) दोन कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव
१)	नौपाडा कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २० ब मधील सिद्धार्थ नगर शिवसेना शाखा परिसरात गटर पायवाट व अनुषंगिक स्थापत्य कामे करणे
२)	नौपाडा कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्रमांक 20 ब मधील अष्टविनायक चौक परिसरात गटर पायवाट व अनुषंगिक स्थापत्य कामे करणे.

ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/ सुरुआहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ www.mahatenders.gov.in येथे दि.६/०४/२०२६ ते दि.१३/०४/२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग दि. १३/०४/२०२६ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.१५/०४/२०२६ रोजी १६.३० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा-नौ- को. प्र.स/०७/२०२६-२७ **सही/-**
दि.०२.०४.२०२६ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणेमहानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

अनधिकृत बांधकामाला आळा घाला..
अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !

आता येतोय 'क्वीन'चा सिक्वेल

कंगना रणौतच्या कारकिर्दीतील अत्यंत यशस्वी ठरलेल्या 'क्वीन' चित्रपटाच्या सिक्वेलची जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन पुन्हा एकदा विकास बहल करणार असून, या दुसऱ्या भागाचे नाव 'क्वीन फॉरेव्हर' असण्याची दाट शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निर्मात्यांनी चित्रपटाच्या नावासाठी अनेक पर्यायांचा विचार केला होता, परंतु 'क्वीन फॉरेव्हर' हे नाव कथेला अधिक साजेसे वाटल्याने त्यावर शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे आहेत. या चित्रपटाचे अधिकृत नाव लवकरच जाहीर केले जाईल आणि एप्रिल महिन्यातच याच्या चित्रीकरणाला सुरुवात होणार असल्याचे समजते. पहिल्या भागात राणी (कंगना रणौत) पॅरिस आणि ॲमस्टरडॅमच्या सफरीवर गेली होती. मात्र, सिक्वेलमध्ये ती परदेशात न जाता भारतातील विविध शहरांची सफर करताना दिसणार आहे. स्वत:चा शोध घेण्याचा तिचा हा प्रवास यावेळी भारतीय संस्कृती आणि विविध शहरांच्या पार्श्वभूमीवर रंगणार आहे. आता १० वर्षांनंतर राणीचा पुढचा प्रवास पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.

अदिवी शेषची स्पष्टोक्ती

दाक्षिणात्य अभिनेता अदिवी शेष आणि मृणाल ठाकूर यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'डॅकोइट: एक प्रेम कथा' या चित्रपटाच्या हिंदी ट्रेलरचे अनावरण नुकतेच मुंबईत करण्यात आले. हा चित्रपट हिंदी आणि तेलगू अशा दोन्ही भाषांमध्ये एकाच



वेळी चित्रित करण्यात आला आहे. या आगळ्यावेगळ्या प्रयोगाबद्दल बोलताना अदिवी शेषने अक्षय कुमारच्या 'पॅडमॅन' चित्रपटाचा विशेष संदर्भ दिला. या कार्यक्रमाला चित्रपटातील कलाकार अदिवी शेष, मृणाल ठाकूर, अनुराग कश्यप आणि झेन मारी खान उपस्थित होते. चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेतील सांस्कृतिक बारकाव्यांवर शेषने प्रकाश टाकला. अदिवी म्हणाला की, प्रत्येक भाषेची आणि प्रांताची एक स्वतंत्र संस्कृती असते. उदाहरण द्यायचे झाले तर, अमेरिकेत अंत्यविधीला काळे कपडे घालून शांतपणे शोक व्यक्त केला जातो, तर भारतात आपण पांढरे कपडे घालतो आणि भावना उघडपणे व्यक्त करतो. हाच विचार आम्ही संगीतातही केला. तेलगू गाणे 'चिचूबुड्डी' हे हिंदी प्रेक्षकांसाठी 'टच बडी' असे करण्यात आले.

'देव डी'चे १७ वर्षांनंतर पुनरागमन

दिग्दर्शक अनुराग कश्यप यांच्या कारकिर्दीला कलाटणी देणारा 'देव डी' हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. २००९ मध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट येत्या २४ एप्रिल रोजी निवडक चित्रपटगृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित केला जाणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. शरदचंद्र चटोपाध्याय यांच्या 'देवदास' या क्लासिक कादंबरीवर आधारित हा चित्रपट आधुनिक काळातील संदर्भांसह मांडण्यात आला होता. अभय देओल, कल्की कोकला आणि माही गिल यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाने तेव्हाच्या तरुणाईवर गारुड घातले होते. संगीतकार अमित त्रिवेदी यांच्यासाठी 'देव डी' हा त्यांच्या कारकिर्दीतील टर्निंग पॉइंट ठरला. 'इमोशनल अत्याचार' आणि 'नयन तरसे' सारख्या गाण्यांनी त्यांना एक नवी ओळख मिळवून दिली.

अभयने या चित्रपटाच्या कल्पनेमागचा किस्सा सांगितला. जेव्हा मी ही कथा इतरांना ऐकवली, तेव्हा अनेकांना ती खूपच 'आर्टी' वाटली होती. पण अनुरागने यात रस दाखवला. 'देवदास'मधील पुरुषप्रधान मानसिकता आणि महिलांचा कणखरपणा अधोरेखित करण्याचा माझा विचार या चित्रपटाद्वारे पडद्यावर आला, असे त्याने नमूद केले.

श्रीराम आणि परशुराम दोन्ही भूमिकांत रणबीरच

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या 'रामायण' या अत्यंत महत्त्वाकांक्षी चित्रपटाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अमेरिकेत या चित्रपटाची टीझर प्रदर्शित झाल्यानंतर आता अभिनेता रणबीर कपूरने यातील आपल्या विशेष भूमिकेबद्दल मौन सोडले आहे. या महाकाव्यात रणबीर केवळ प्रभू श्रीरामाचीच नव्हे, तर भगवान परशुरामाचीही भूमिका साकारत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

यासंदर्भात रणबीरने सांगितले की, विष्णूच्या दोन वेगवेगळ्या अवतारांना पडद्यावर साकारणे हा एक विलक्षण अनुभव होता. प्रभू श्रीराम आणि भगवान परशुराम या दोन्ही महान व्यक्तिरेखा एकाच चित्रपटात साकारण्याची संधी मिळणे ही एक अभिनेता म्हणून माझ्यासाठी मोठी पर्वणी आहे, असे रणबीरने नमूद केले.

रणबीरने या दोन्ही भूमिकांसाठी केवळ शारीरिक बदलांवरच नव्हे, तर त्यांच्या आध्यात्मिक आणि भावनिक पैलूंवरही विशेष लक्ष दिले आहे. तो म्हणाला, केवळ देहबोली बदलून चालत नाही, तर त्या पात्रांची आध्यात्मिकता आणि संवेदनशीलता समजून घेणे महत्त्वाचे असते. 'रामायण'चे चित्रीकरण सुरू होण्यापूर्वीच्या वर्षभरात मी याच गोष्टींचा सखोल अभ्यास केला. रणबीर कपूरच्या या दुहेरी अवतारामुळे प्रेक्षकांमध्ये आता या चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

राजकुमार रावची 'कंजूस'गिरी

नेटफ्लिक्सने त्यांच्या आगामी 'टोस्टर' या डार्क कॉमेडी चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून, यामध्ये राजकुमार राव एका अत्यंत काटकसरी आणि चिक्कू माणसाच्या भूमिकेत दिसत आहे. साऱ्या मल्होत्राची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट १५ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विवेक दास चौधरी दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती राजकुमार रावची पत्नी पत्रलेखा हिने 'कांपा फिल्म्स' या त्यांच्या स्वत:च्या बॅनरखाली केली आहे. एखाद्या वस्तूचा मोह किंवा पैशांची अतिबचत माणसाला कशा प्रकारे अडचणीत आणू शकते, याचे मजेशीर चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. चित्रपटाची कथा रमाकांत (राजकुमार राव) या पात्राभोवती फिरते, जो प्रत्येक रुपया वाचवण्यात धन्यता मानतो. एका लग्नात भेट म्हणून दिलेल्या टोस्टरवरून सुरू झालेला हा वाद आणि तो परत मिळवण्यासाठी रमाकांतने केलेले प्रयत्न, यातून संपूर्ण कथानकात गोंधळ निर्माण होतो. रमाकांतची ही साधी जिद्द कशा प्रकारे अनपेक्षित वळणे घेते आणि त्याच्यासोबत इतरांनाही संकटात टाकते, हे ट्रेलरमध्ये पाहायला मिळते. 'टोस्टर' चित्रपटात कलाकारांची मोठी फौज पाहायला मिळणार आहे.

'प्रलय'बाबतच्या अफवांना पूर्णविराम

दिग्दर्शक हंसल मेहता यांनी त्यांच्या आगामी 'प्रलय' या महत्त्वाकांक्षी चित्रपटाबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. अभिनेता रणवीर सिंगची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट कोणत्याही साहित्याचे रुपांतर (ॲडॉप्टेशन) नसून, ती एक पूर्णपणे मूळ कथा असल्याचे मेहता यांनी स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून हा चित्रपट विशिष्ट पुस्तकावर आधारित असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. या पार्श्वभूमीवर 'द हॉलिवूड रिपोर्टर'ला दिलेल्या मुलाखतीत मेहता यांनी या सर्व अफवांना पूर्णविराम दिला. या चित्रपटाची मूळ संकल्पना दिग्दर्शक जय मेहता यांची आहे. जय दीर्घकाळापासून या विषयावर काम करत होते. हंसल मेहता म्हणाले की, जेव्हा रणवीरने जयचे काम पाहिले, तेव्हा त्याने स्वत:हून संपर्क साधला. जयने त्याला कथेची संकल्पना ऐकवली आणि रणवीरला ती प्रचंड आवडली. त्यानंतर आम्ही या चित्रपटाचे जग उभारण्यासाठी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. 'प्रलय' हा चित्रपट एका 'पोस्ट-अपोकॅलिप्टिक' (विनाशानंतरचे जग) पार्श्वभूमीवर आधारित आहे. अशा प्रकारचा भव्य प्रयोग भारतीय चित्रपटसृष्टीत याआधी कधीही झाला नसल्याचा दावा मेहता यांनी केला आहे.

हेल्दी Me

टेनिस एल्बो हा आजार प्रामुख्याने हाताच्या कोपराशी संबंधित असून तो केवळ खेळाडूंसाठी मर्यादित नाही. वैद्यकीय भाषेत याला 'लॅटरल एपिकॉन्डिलायटिस' असे म्हणतात. कोपराच्या बाहेरील बाजूला असलेल्या अस्थिबंधनांना (टेनडन्स) सूज आल्यामुळे किंवा तिथे सूक्ष्म इजा झाल्यामुळे हा त्रास उद्भवतो. जेव्हा आपण हाताच्या मनगटाची किंवा बाहूची वारंवार हालचाल करतो, तेव्हा कोपराच्या स्नायूंवर अतिरिक्त ताण पडतो. या ताणामुळे हाताची पकड कमकुवत होणे किंवा कोपरापासून मनगटापर्यंत तीव्र वेदना होणे अशी लक्षणे दिसू लागतात. आधुनिक जीवनशैलीमध्ये मोबाईल, संगणकाचा वाढता वापर आणि कामाच्या बदलत्या पद्धतींमुळे या आजाराचे प्रमाण वाढताना दिसत आहे.

'टेनिस एल्बो' चा सामना करताना...

या आजाराचे नाव टेनिसशी जोडलेले असले तरी, प्रत्यक्षातील आकडेवारीनुसार दहापैकी नऊपेक्षा जास्त रुग्ण हे टेनिस न खेळणारे असतात. कोपराच्या स्नायूंचा आणि अस्थिबंधनांचा अतिवापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला हा त्रास होऊ शकतो. दैनंदिन जीवनात प्लंबर, सुतार, रंगकाम करणारे कारागीर किंवा अगदी खाटिक काम करणाऱ्या व्यक्तींनाही हा त्रास होण्याची शक्यता अधिक असते. याचे मुख्य कारण म्हणजे या व्यवसायांमध्ये हाताचा आणि मनगटाचा वापर वारंवार एकाच पद्धतीने आणि ताकदीने करावा लागतो. याव्यतिरिक्त संगणकाचा माऊस सतत वापरणे, जड वस्तू वारंवार उचलणे किंवा स्वयंपाकघरात सतत सुरीने कापण्याची कामे करणे यामुळेही कोपराच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो. साधारणपणे ३० ते ६० वयोगटातील व्यक्तींमध्ये हा त्रास प्रामुख्याने दिसून येतो, कारण या वयात शरीराची झीज भरून काढण्याची क्षमता हळूहळू कमी होऊ लागते.

मुख्य लक्षणे

टेनिस एल्बोची लक्षणे ओळखणे तसे सोपे असते, मात्र अनेकदा लोक त्याकडे साधी कळ म्हणून दुर्लक्ष करतात. कोपराच्या बाहेरील हाडाच्या भागावर स्पर्श केल्यास तीव्र वेदना होणे हे याचे मुख्य लक्षण आहे. सकाळी उठल्यावर हात कडक होणे किंवा वस्तू पकडताना हाताला त्राण नसल्यासारखे वाटणे असे अनुभव या त्रासामध्ये येतात. अनेकदा हस्तांदोलन करणे किंवा साधा चहाची कप धरतानाही रुग्णाला त्रास होऊ शकतो. या वेदना रात्रीच्या वेळी जास्त जाणवतात आणि हळूहळू पूर्ण हातामध्ये पसरत जातात.

जर मनगट मागे वळवताना किंवा हाताची बोटे सरळ करताना कोपरात कळा येत असतील, तर ते टेनिस एल्बोचे निश्चित लक्षण मानले जाते.

प्रमुख कारणे आणि जोखीम

टेनिस एल्बो होण्यामागे प्रामुख्याने हाताच्या स्नायूंची पुनरावृत्ती होणारी हालचाल जबाबदार असते. जेव्हा आपण मनगट वर उचलतो किंवा हात सरळ करतो, तेव्हा कोपराच्या बाहेरील बाजूचे स्नायू सक्रिय होतात. या स्नायूंचे टोक ज्या ठिकाणी हाडाला जोडलेले असते, तिथे वारंवार ओढ लागल्यामुळे 'मायक्रो-टीअर्स' म्हणजेच सूक्ष्म जखमा तयार होतात. खेळाडूंच्या बाबतीत विचार केला तर टेनिसमध्ये 'बॅकहँड' फटका मारताना जर तंत्र चुकीचे असेल, तर कोपरावर प्रचंड ताण येतो. व्यवसायाव्यतिरिक्त धूम्रपान, लठ्ठपणा आणि काही विशिष्ट औषधांचे सेवन यामुळेही अस्थिबंधनांची लवचिकता कमी होऊन हा त्रास उद्भवू शकतो. वाढत्या वयानुसार या उतींची दुरुस्ती होण्याची प्रक्रिया मंदावते, त्यामुळे चाळीशीनंतर अधिक काळजी घेणे गरजेचे असते.

या आजारावर उपचार करताना विश्रांतीला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. ज्या हालचालींमुळे कोपरावर ताण येतो, त्या काही काळ पूर्णपणे थांबवणे किंवा त्यामध्ये बदल करणे आवश्यक असते. प्राथमिक स्तरावर 'राईस' (विश्रांती, बर्फ, कॉम्प्रेशन आणि उन्नती) पद्धतीचा वापर केला जातो. बर्फाचा शेक देणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने दाहशामक औषधे घेणे सूज कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते. काही प्रकरणांमध्ये हाताला आणि कोपराला स्थिरता देण्यासाठी विशेष ब्रेस किंवा पट्टा वापरण्याचा सल्ला दिला जातो, ज्यामुळे स्नायूंना विश्रांती मिळते. विशिष्ट व्यायामांच्या माध्यमातून कोपराच्या आजूबाजूचे स्नायू बळकट केले जातात, ज्यामुळे अस्थिबंधनांवरील भार कमी होतो.

साध्या उपचारांनी काही आठवड्यांत फरक पडला नाही, तर आधुनिक वैद्यकशास्त्रात इतर प्रगत पर्याय उपलब्ध आहेत. यामध्ये 'पीआरपी' (प्लेटलेट रिच प्लाझ्मा) इंजेक्शन्सचा समावेश होतो, ज्यामध्ये रुग्णाच्या स्वत:च्या रक्तातील घटक वापरून नैसर्गिकरीत्या जखम भरून काढली जाते. तसेच शॉकवेव्ह थेरपीच्या माध्यमातून कोपराच्या प्रभावित भागावर ध्वनीलहरी सोडल्या जातात, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि बरे होण्याची प्रक्रिया वेगवान होते. स्टिरॉइड इंजेक्शन्सचा वापर वेदना तात्काळ कमी करण्यासाठी केला जाऊ शकतो, मात्र त्याचा वापर मर्यादित असावा लागतो. अत्यंत दुर्मीळ परिस्थितीत, जेव्हा रुग्ण सहा महिने ते वर्षभर कोणत्याही उपचारांना प्रतिसाद देत नाही आणि दैनंदिन कामे करणे अशक्य होते, तेव्हाच शस्त्रक्रियेचा विचार केला जातो. ■■■

डॉ. सम्यक पंचोली,
शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन

हेल्दी टिप्स

ओटस्मध्ये कॅल्शिअम, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि बी जीवनसत्त्वाची पातळी अधिक असते. हे आपल्या मज्जासंस्थेसाठी अत्यंत फायदेशीर असते. ओटस्मधील इनोजिटॉल रक्तातील चरबीचे प्रमाण किंवा पातळी नियंत्रित ठेवते. मधुमेही रोग्यांनीही याचे नियमित सेवन करण्यास हरकत नाही. मात्र प्रिझर्व्हेटिव नसलेले ओटस् घ्यावेत.

पनीरमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असतात. त्यामुळे शरीरातील स्नायूंना बळकटी मिळते. पनीरमध्ये व्हिटॅमिन डी, कॅल्शियमही विपुल असते. त्यामुळे पनीरच्या सेवनामुळे हाडे आणि दातांना मजबुती मिळते. वजन कमी करण्यासाठी पनीर लाभदायक ठरते. इतकेच नव्हे तर मधुमेहींसाठीही पनीरचा आहारात समावेश करणे फायद्याचे ठरते. पनीरमध्ये आढळणारे ओमेगा ३ मानसिक विकास करण्यास साहाय्य भूत ठरते. रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल यांची पातळी संतुलित राखण्यासही पनीर खाल्ल्यामुळे मदत होते.

सर्दी-खोकल्यावर ब्रँडी प्रभावी ठरते का?

मुलांना सर्दी-खोकला होणे ही सामान्य बाब आहे. बरेचदा औषधे देऊनही तो बरेच दिवस बरा होत नाही. अशा वेळी काही जण एक-दोन चमचे किंवा टोपण ब्रँडी देण्याचा पर्याय अवलंबतात. विशेष म्हणजे डॉक्टरांनीच हा उपाय सांगितल्याची पुष्टी देऊन आजारी मुलांना ब्रँडी देतात. पण खरोखरीच हे योग्य आहे का?

अर्थातच, याचे उत्तर नाही असे आहे. कारण लहान मुलांच्या शरीररचनेत प्रौढांप्रमाणे मद्य पचविण्याची क्षमता नसते. मद्य हे औषध नाहीये. त्याचा एक थेंबही बालकांसाठी अपायकारक ठरू शकते. लहान मुलांची यकृतक्रिया, तंत्रिका-विकास आणि चयापचय प्रक्रिया पूर्ण विकसित नसतात, त्यामुळे मद्य शरीरात गेल्यानंतर ते सुरक्षितपणे विघटित करण्याची क्षमता त्यांच्यात नसते. या कारणामुळे ब्रँडीचा थेंबसुद्धा यकृतावर अतिरिक्त भार टाकतो, मेंदूवरील दुष्परिणाम वाढवतो आणि शरीरातील साखरेचे प्रमाण झपाट्याने कमी करतो. रक्तातील ग्लुकोजचा हा अचानक उतार धोकादायक असतो आणि त्यामुळे झटके येण्यापर्यंत स्थिती बिघडू शकते. इतकेच नव्हे तर श्वसनक्रिया मंदावण्याचा धोका वाढतो. यामुळे जीवावर बेतणाऱ्या गुंतागुंती उद्भवू शकतात. त्यामुळे ब्रँडीने सर्दी बरी होते हा समज वैज्ञानिकदृष्ट्या चुकीचा असून प्रत्यक्षात तो मुलाच्या आरोग्यास गंभीर इजा करणारा ठरू शकतो.

पारंपरिक समजुतींची ताकद कितीही असली तरी वैद्यकीय शास्त्राने सिद्ध केलेले तथ्य स्पष्ट आहे की, सर्दी-खोकल्यावर मद्याचा कोणताही उपचारात्मक परिणाम होत नाही. सर्दी हा बहुतेक वेळा विषाणू संसर्ग असतो आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती त्याचा मुकाबला करत असते. ■■■

ग्रेड-१ फॅटी लिव्हरचा इशारा

आजच्या घडीला चुकीचा आहार, अनियमित दिनक्रम, सतत वाढता ताण आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे ग्रेड-१ फॅटी लिव्हर ही अवस्था झपाट्याने वाढत आहे. ही लिव्हरशी संबंधित सुरुवातीची समस्या असून वेळीच निदान झाले आणि योग्य बदल केले तर नंतरचे गंभीर परिणाम टाळता येऊ शकतात. फॅटी लिव्हरमध्ये यकृताच्या पेशींमध्ये चरबी साचू लागते. यकृताच्या वजनातील ५ ते १० टक्के भाग चरबीने व्यापला जातो तेव्हा त्या अवस्थेला ग्रेड१ फॅटी लिव्हर असे म्हणतात. ही या रोगाची सर्वात प्रारंभिक पायरी मानली जाते. सामान्य आणि निरोगी लिव्हरमध्ये चरबी अतिशय कमी प्रमाणात असते. मात्र हे प्रमाण वाढू लागले की लिव्हरची नियमित कार्यक्षमता बाधित होते. या अवस्थेत बहुतेकांना काहीही लक्षणे जाणवत नाहीत. परंतु दुर्लक्ष केल्यास ही समस्या ग्रेड २ किंवा ग्रेड ३ पर्यंत पोहोचू शकते आणि तेव्हा परिस्थिती गुंतागुंतीची बनू शकते.

लक्षणे कोणती?

फॅटी लिव्हर ग्रेड १ ची सुरुवात झाली की थोडेसे कष्ट केल्यानंतर थकवा जाणवणे, उजव्या बाजूला बरगडीखाली हलका त्रास जाणवणे, वारंवार गॅस, अपचन किंवा जेवल्यावर अस्वस्थता जाणवणे, पोट जड वाटणे अशी लक्षणे दिसू लागतात. यकृत शरीराला ऊर्जा पुरवत असल्यामुळे त्याची कार्यक्षमता घटल्यास मानसिक थकवाही जाणवतो.

कारणे काय?

ही समस्या अचानक उद्भवत नाही. ती आपल्या दैनंदिन सवयींशी थेट जोडलेली असते. अनियमित आणि असंतुलित आहार, साखर आणि कार्बोहायड्रेटचे अति सेवन, मद्यपान, इन्सुलिन रेजिस्टन्स, प्री-डायबिटीज, डायबिटीज, व्यायामाचा अभाव आणि अनुवंशिक घटक ही याची कारणे आहेत. खरे पाहता, या अवस्थेला लक्षणहीन पातळी म्हणतात. कारण बहुतेकांना कोणतीही ठोस लक्षणे जाणवत नाहीत. तरी शरीर हे कोणत्याही बदलांचे संकेत देतच असते.

तपासण्या

या समस्येच्या निदानासाठी अल्ट्रासाउंड ही सर्वात सोपी आणि खात्रीलायक चाचणी मानली जाते. या तपासणीत लिव्हर किंचित उजळ दिसणे किंवा आकार वाढणे याची माहिती मिळते, जी फॅटी लिव्हर ग्रेड-१ची पुष्टी करते. यासह लिव्हर फंक्शन टेस्ट, लिपिड प्रोफाईल आणि ब्लड शुगर तपासण्या यांमुळे संपूर्ण चयापचयस्थितीचे चित्र स्पष्ट होते. निदानाच्या या प्रारंभी टप्प्यावर योग्य हस्तक्षेप केल्यास यकृत पुन्हा सदृढ किंवा पूर्ववत होण्याची क्षमता अत्यंत जास्त असते. त्यामुळे ही अवस्था धोकादायक ठरावी असे काहीच कारण राहत नाही. अट एकच, उपचाराची सुरुवात योग्य वेळी झाली पाहिजे. उपचाराच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जीवनशैलीतील शिस्तबद्ध बदल. जादा वजन असलेल्या व्यक्तींनी केवळ ५ ते १० टक्के वजन कमी केले तरी लिव्हरमधील चरबीचे प्रमाण स्पष्टपणे घटते. नियमित चालणे, हलका व्यायाम, शरीराला सक्रिय ठेवणारे साधे उपक्रम जसे की जिने वापरणे, दर तासाने उठून काही पावले चालणे ही छोटी कृतीही मोठा फरक घडवते. आहारात कमी तेल, कमी साखर आणि अधिक तंतुमय पदार्थांचा समावेश केल्यास लिव्हरवरील ताण घटतो. सुरुवातीच्या टप्प्यात औषधांपेक्षा शिस्तबद्ध सवयींचा लाभ अधिक प्रभावी ठरतो. ■■■

नवाकाळ शब्दकोडे-१५६७



आडवे शब्द –

१. समर्थन, पाठबळ देणे४. भावाची बायको ८. सढळ हाताने देणारा १०. घराण्याची एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अशी चालत आलेली संपत्ती ११. 'फिटे अंधाराचे जाळे' या गाण्याचे गीतकार, सुप्रसिद्ध कवि १५. मंदिर, देऊळ १६. पावलांचा आवाज, चाहूल १७. श्रीमंत माधवराव पेशवे यांचे काका १८. तजेला २१. कूर्म, कच्छप २३. आपल्या देशाची राजधानी २४. प्रत्येक २५. जनतेचा कौल २७. प्रतिष्ठा २८. अरण्य २९. वृक्ष, बाग, अरण्य ३०. घायाळ, जखमी ३२. चांगले सलगीचे संबंध ३३. वाईट, नासका ३४. हल्ला ३६. जाण, आकलन ३८. रमलेला ४०. घर, सदन ४१. मनाची घालमेल ४२. शेकडा प्रमाण ४३. विनोबांचा आश्रम ४६. पोळ्यातील माशी ४७. गुजराथी नृत्य ४८. कमी दर्जाचा ४९. शास्त्रीय संगीत गाणारा ५१. त्या वेळी ५२. विश्व ५४. तोल, तोरा ५५. बेशुद्धी ५७. मातीचा छोटा दिवा ५९. पश्चिम दिशा ६०. उट्टे ६२. सौम्य धोरण ६३. पूर्वज, वाडवडील ६५. चार ओळींची अर्थपूर्ण कविता ६६. पूर्वी धान्य दळण्यासाठी हे दगडी साधन वापरीत ६८. वर्षाचा बारावा हिस्सा ७०. निकस खाणे ७२. निवृत्त, भूतकालीन ७४. पोपट, रावा ७५. वर्ष ७६. कसदार ७८. शरीर, देह ७९. पोटासाठी जड नसलेला आहार ८१. चिखल ८२. नोकरी ८३. बस्तान ८५. पूर्ण, पर्याप्त ८६. कणिदार, रवाळ ८७. विद्यार्थ्यांसाठी वर्गात असलेले लाकडी आसन ८८. आच, उष्णता ९१. एकाएकी ९२. विरळ, अधूनमधून घडणारे ९३. हुरहूर लावणारी वेळ

उभे शब्द –

१. 'भेटीलागी जीवा लागलीसे आस....' (संत तुकाराम) २. भोट, खुळचट ३. अंतर मोजण्याचे मेट्रिक परिमाण ४. त्यागलेले ५. कल्याण, फायद्याची गोष्ट ६. उतावीळ ७. जपानी कुस्ती ९. गयावया करणे- ×× ×× करणे ११. श्रीकृष्णाचे शस्त्र १२. गोळा १३. आंदोलनाचा एक प्रकार, वेढा १४. जिंकलेला, पार केलेला प्रदेश १९. मुख २०. पौर्णिमा २२. वेळ २५. दहशत २६. बाजारपेठेतील मरगळ २७. सुगंध २८. कोळसे-लाकडाचे दुकान २९. उपासना ३०. आकलन ३१. खोटारडा ३४. आंब्याचे बन ३५. माजलेला ३६. सूर्योदयाची वेळ ३७. निकटचे संबंध ३९. ज्वर मोजण्याचे साधन ४१. चार चाकी खासगी वाहन ४४. डाळीचे कालवण ४५. ताकद ४७. गोरा व सावळा यांच्या मधला वर्ण ५०. नवरदेवाची आई ५१. तितके ५३. गुरांचे अन्न ५४. गोठ्याचे फाटक ५६. दादागिरी ५८. बोजवारा उडणे ६१. आयुर्वेदाचे एक प्राचीन ग्रंथकार ६३. शंकराचे धनुष्य ६४. उदास, कष्टी ६५. पालथ्या घमेल्यावर भाजला जाणारा भला मोठा पोळीसारखा प्रकार ६७. कुबेराची राजधानी ६९. धडा, अद्दल, तोटा ७१. श्रीकृष्ण ७३. पर्वत ७५. निष्कपट ७७. शर्ट ७८. मंगळ ८०. किरकोळ, नगण्य ८४. भिस्त, अवलंबून राहणे ८५. उमाळा, भरते ८६. दंत ८७. धातूचा पोकळ व मोठा तुकडा,वकिलांचे कोर्टातले दालन ८९. मूल ९०. चुरमुरे-फरसाण यांचे चटपटीत मिश्रण

•

नवाकाळ कोडे क्रमांक १५६६ चे उत्तर

आडवे शब्द : १. कलाकारी ४. ओकाबोका ७. मालक ९. विमल ११. उच्चाटन १२. तोबरा १३. कूजन १५. लघुकोन १६. वडी १८. नवरात्र २१. खडा २३. धोकादायक २५. नालायक २६. लगट २७. अजब २८. माज २९. आवक ३१. मैना ३२. डफ ३४. मार्दव ३५. लवलेश ३७. खजील ३९. मिथ्या ४०. लहान ४२. पोक ४३. लेकरू ४५. घुटका ४७. ताकद ४८. वास ५०. पाणि ५१. झुबे ५२. राखणदार ५४. पडते ५५. सफल ५६. दान ५७. धरण ५९. घालमेल ६०. नार ६२. मावशी ६४. जिन ६५. दैव ६६. फलश्रुती ६८. डर ७०. धान्य ७२. द्रूत ७३. बेकरी ७५. बरेच ७६. नाखवा ७८. चूपचाप ७९. बाज ८०. तागडी ८२. बीमोड ८३. टोक ८५. बाड ८७. हकनाक ८९. हटवादी ९१. बोरीबंदर ९४. दूर ९५. गदारोळ ९६. खादाड ९७. धमकी ९८. दक्ष ९९. सासर १००. अंमलदार

उभे शब्द : १. कच्चा २. लाट ३. कानवला ४. ओबडधोबड ५. कारा ६. काकू ७. मानव ८. कलत्र ९. विकोपाला गेलेले भांडण १०. मन ११. उच्छृंखल १४. जनक १७. सुदामा १९. राजीव २०. शेकरू २२. डागडुजी २४. यजमान २७. अनामिका २९. आव ३०. कलकत्ता ३३. फलक ३६. शक ३७. खतपाणी घालणे ३८. लघु ४१. हादरा ४४. रूक्ष ४६. टरफल ४७. ताबेदार ४८. वाण ४९. सदाशिव ५३. खर्च ५४. परवड ५५. समेट ५८. कानपिचक्या ६०. नाव ६१. फलद्रूप ६२. माती ६३. शीर्षक ६५. दैन्य ६७. श्रुत ६९. रबडी ७०. धावा ७१. आप ७३. बेजबाबदार ७४. रीता ७६. नामोहरम ७७. खडक ७८. चूक ७८अ. चापट ८१. गजरी ८३. टोकदार ८४. धुंदी ८६. गोंद ८८. नाग ८९. हळद ९०. वारा ९२. बंडल ९३. रफार ९४. दूध ९६. खास

अमेरिकेची ४८ तासांची मुदत इराणने फेटाळली

पान १ वरून- जोडलेला मुद्दा आहे. त्यामुळे कोणत्याही एकतर्फी दबावाला उत्तर देताना इराण मागे हटणार नाही. या धमक्यांचा अर्थ तुमच्यासाठीही नरकाचे दरवाजे उघडले जातील, असा आहे. दरम्यान, अमेरिकेने इराणमध्ये पाडण्यात आलेल्या एफ-१५ई लढाऊ विमानामधील वैमानिकाला सुखरूप वाचवल्याचा दावा केला. एका वैमानिकाची सुटका यापूर्वीच केली होती, मात्र दुसरा वैमानिक अनेक तास बेपत्ता होता. त्याचा सतत शोध घेतला जात होता. अमेरिकन सैन्याने अत्याधुनिक लढाऊ विमानांचा आणि विशेष बचाव पथकांचा वापर करून त्याला वाचवले. इराणमध्ये या वैमानिकाला पकडून देणाऱ्यास ६०,००० डॉलर्सचे बक्षीस जाहीर केले होते.

बारामती पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसची उमेदवारी जाहीर

पान १ वरून

इच्छा बोलून दाखवली होती. मात्र, विरोधी महाविकास आघाडीत ही निवडणूक लढण्यावरून मतभेद होते. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने ही पोटनिवडणूक लढणार नसल्याचे जाहीर केले आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या उबाठाचे अजून यासंदर्भात काही ठरलेले नाही, असे खा. संजय राऊत यांनी आज सांगितले. मात्र, काल सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांना फोन केल्यानंतर उबाठा या निवडणुकीत आपला उमेदवार न उतरवण्याची शक्यता आहे. काँग्रेसने सुरुवातीपासून ही निवडणूक लढवण्याची ठाम भूमिका घेतली होती. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. यावरून मविआत अनेक दिवस खल झाल्यावर अखेरीस आज संध्याकाळी काँग्रेसने आकाश मोरे यांच्या नावाची घोषणा केली. त्यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना फोन केल्याचे वृत्त थडकले. सुनेत्रा पवार आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्यात फोनवर नेमके काय बोलणे झाले, याचा तपशील उघड झाला नाही. मात्र, सुनेत्रा पवार यांच्या फोननंतरही काँग्रेसच्या भूमिकेत बदल झाला नाही.

अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष अजूनही ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्नशील आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे म्हणाले की, बारामती मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी काँग्रेसने आम्हाला पाठिंबा ही निवडणूक राजकारण करण्याची बाब नाही. ती बिनविरोध व्हावी अशी आमची भूमिका आहे. त्यामुळे गरज पडली तर आम्ही राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांचीदेखील भेट घेऊ. कारण असे निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतले जातात.

दुसरीकडे बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची चर्चा अजूनही सुरू असली तरी आतापर्यंत १९ उमेदवारांनी या निवडणुकीसाठी अर्ज भरला आहे. त्यामध्ये हिंदुस्तान जनता पार्टीचे सतीश कदम, न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे राघू घटुकडे, राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीचे अरुण निटुरे यांच्यासह सागर भिसे, गजानन गवळी, त्रिशाला कांबळे, दिलीप अळोणी, दत्तात्रेय बेदरे, मिथून आटोळे, रजाक मुलाणी, संदीप खरात, विलास होळकर, अभिजीत बिचुकले, अनिल तुपे, संकेत गावडे, दादा थोरात आणि अभिजीत कांबळे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची अखेरची तारीख ९ एप्रिल आहे. हे उमेदवार अर्ज मागे घेतात का, याकडेही लक्ष असेल.

लोकलच्या दारात उभे राहून प्रवास हा निष्काळजीपणा नाही

पान १ वरून- फेटाळला होता. त्यामुळे अश्रप्पा भंडारी आणि सत्यम्मा भंडारी यांनी उच्च न्यायालयात याला आव्हान दिले होते. न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी २ एप्रिलला या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायाधिकरणाचा निर्णय बदलला आणि मृताच्या वारसांना दिलासा दिला.

न्यायालयाने या प्रकरणात अधिकृत अहवालांमध्ये तफावत असल्याचे नमूद केले. काही अहवालांनुसार भंडारी प्लॅटफॉर्मच्या टोकावर उभे असताना त्यांना लोकलची धडक बसली, तर काहींनी ते चालत्या ट्रेनमधून पडल्याचे म्हटले होते. तसेच या घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने न्यायालय कोणत्याही एका व्यक्तीच्या विधानावर पूर्णपणे विसंबून राहू शकत नाही, असे न्यायमूर्ती जैन यांनी सांगितले. उच्च न्यायालयाने रेल्वेला अपघाताच्या तारखेपासून वार्षिक ६ टक्के व्याजासह ४ लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.ही रक्कम जास्तीत जास्त ८ लाख रुपयांच्या मयदित असावी आणि दोन्ही दावेदारांना ती समान वाटून द्यावी.

कामाच्या पहिल्या दिवशीच सुरक्षारक्षकाचा पडून मृत्यू

■ मुंबई

चेंबूरमधील सुभाषनगरमध्ये बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून तोल जाऊन खाली पडल्याने सुरक्षारक्षकाचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे या सुरक्षारक्षकाचा कामाचा पहिलाच दिवस होता.

या दुर्घटनेतील मृत सुरक्षारक्षकाचे नाव नथुराम साखविलकर (५२) असे असून ते चेंबूरच्या घाटला परिसरात राहत होते. सुभाषनगर येथील इमारत क्रमांक १०मध्ये वैभव लक्ष्मी डेव्हलपर्समार्फत पुनर्विकासाचे काम सुरू आहे. नथुराम हे या इमारतीत सुरक्षारक्षक म्हणून ड्युटीवर होते. शुक्रवारी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास ते इमारतीतील एलिव्हेटर पार्किंग सिस्टमची पाहणी करीत होते. यावेळी पार्किंगच्या पाचव्या मजल्यावरील प्लॅटफॉर्मवरून त्यांचा तोल गेला आणि ते थेट तळमजल्यावरील मोकळ्या जागेत कोसळले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या मदतीने साखविलकर यांना तातडीने राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, आधीच ते मृत झाले असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. नथुराम यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

'आर्टेमिस'च्या अंतराळयात्रींनी टिपले चंद्र-पृथ्वीचे अद्भुत फोटो

पान १ वरून

दूरून पृथ्वीचे असे दर्शन पुन्हा एकदा मानवाला घडले. या मोहिमेत वापरले जात असलेले ओरियन स्पेसक्राफ्ट हे अंतराळयान म्हणजे जणू अंतराळातील एक छोटेसे घरच आहे. या यानातून अंतराळवीर केवळ चंद्राकडे प्रवास करत नाहीत, तर त्यांच्या दैनंदिन आयुष्याची झलकही जगासमोर येते. खिडक्यांमधून दिसणारा चंद्र जसजसा जवळ येत आहे, तसा तो अधिक मोठा आणि भव्य दिसत आहे. अंतराळवीरांच्या मते, आता चंद्र अगदी हाकेच्या अंतरावर असल्यासारखा भासतो आहे. अंतराळयानातील प्रकाश कमी ठेवून बाहेरील दृश्य अधिक स्पष्ट दिसावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. या वेळी कॅनडाचे अंतराळवीर जेरेमी हॅनसेन खिडकीतून बाहेर पाहत चंद्राचे सौंदर्य अनुभवताना दिसले.

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील ब्लॅक बॉक्स, सीव्हीआरची माहिती द्या

पान १ वरून

महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळले होते. या भीषण दुर्घटनेत २४१ प्रवासी आणि इतर १९ जणांसह एकूण २६० जणांचा मृत्यू झाला होता. विमान दुर्घटना अन्वेषण विभागाने मागील वर्षी जुलै महिन्यात प्राथमिक अहवाल सादर केला होता. अंतिम अहवाल येत्या जून महिन्यात, दुर्घटनेच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त जाहीर होण्याची शक्यता आहे.

कुटुंबियांनी विमान कंपनीवरही माहिती न दिल्याचा आरोप केला आहे. अपघातात आईला गमावलेल्या किंजल पटेल यांनी सांगितले की, पीडितांच्या वस्तू ओळखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर अनेक अडचणी येत आहेत. संकेतस्थळावर हजारो वस्तूंची यादी आहे. मात्र छायाचित्रे अस्पष्ट असल्याने ओळख पटवणे कठीण जाते. खेडा येथील रोमिन वोरा यांनी सांगितले की, तांत्रिक साधनांची कमतरता असल्यामुळे अनेक कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकच पत्रव्यवहार पत्ता उपलब्ध असून प्रतिसाद मिळण्यासाठी अनेक दिवस लागतात. ग्रामीण भागातील अनेकांना या पद्धतींचा वापर करणे कठीण जाते. तर दुर्घटनेत २४ वर्षीय मुलगा गमावलेल्या निलेश पुरोहित म्हणाले की, कोणतीही भरपाई ही आमची पोकळी भरू शकत नाही. आम्हाला केवळ सत्य जाणून घ्यायचे आहे.

अवकाळी पावसाचा तडाखा चंद्रपुरात वीजपुरवठा खंडित

पान १ वरून

लागला. गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या उष्णतेनंतर या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून तापमानात घट झाल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. पहाटेच्या सुमारास झालेल्या वीज खंडितीमुळे दैनंदिन कामकाजावर काही काळ परिणाम झाला.

मेहकर तालुका येथील साबरा गावात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे.

येथील खाजगी अनाथ आश्रम व निवासी विद्यालयाची अवस्था दयनीय झाली असून, सुमारे ४० ते ४५ विद्यार्थ्यांच्या शिक्षण, निवास आणि भोजन व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या झोपड्या पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न गंभीर बनला असून शासनाने तात्काळ मदत करावी, अशी मागणी होत आहे.

सातारा जिल्हा मध्येही गेल्या चार ते पाच दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा जोर कायम आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून बळीराजा संकटात सापडला आहे. कराड तालुक्यातील ओंड गावात सहा एकर क्षेत्रावरील कलिंगड पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेला आहे.

एसआयटी चौकशीनंतर भोंदू खरातचा मुलगा नॉट रीचेबल

पान १ वरून

मुद्दाम लपून बसला आहे की इतर काही कारण आहे, असा संशय व्यक्त केला जात आहे.

याप्रकरणी अशोक खरातने अनेक पतसंस्थांमध्ये उघडलेली सर्व बँक खाती एकाच विशिष्ट तारखेला उघडल्याची माहितीही तपासात उघड झाली आहे. तो तब्बल १३२ बँक खात्यांचा वारसदार आहे. यापैकी १०० खाती राहाता येथील समता पतसंस्थेत, तर ३२ खाती सिन्नरच्या कुंदेवाडी येथील जगदंबा पतसंस्थेत आहेत. या सर्व खात्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची मोठी उलाढाल झाली आहे. यामध्ये जगदंबा पतसंस्थेतील ३२ खात्यांतून सुमारे २.७४ कोटी रुपये, तर समता पतसंस्थेतील १०० खात्यांतून तब्बल ६० कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहेत. ही खाती जरी तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर असली तरी त्या खातेदारांचा पतसंस्थेशी कोणताही प्रत्यक्ष संबंध नव्हता. सर्व आर्थिक व्यवहार स्वतः अशोक खरातच हाताळत होता. जगदंबा पतसंस्थेचे व्यवस्थापक अविनाश कांडेकर यांनी पोलीस चौकशीत खरातच्या प्रभावामुळे आपल्याकडून गंभीर चुका झाल्याची कबुली दिली. त्याचबरोबर एका तक्रारीनुसार ६० लाख रुपये किमतीची जमीन केवळ २२ लाख रुपयांत बळकावल्याप्रकरणी खरातवर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फसवणुकीत एजंटची भूमिका महत्वाची असल्याचे तक्रारदाराने म्हटले.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज, भोंदू अशोक खरातला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. ते म्हणाले की, भोंदू अशोक खरातला फाशी दिली पाहिजे. खरात असो किंवा इतर कुणीही असो विकृत मनोवृत्तीच्या लोकांना ठेचून फाशीची शिक्षा द्यावी. हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवावे. सरकारने एसआयटीच्या माध्यमातून भोंदू खरात प्रकरणाची सखोल चौकशी करावी. ज्यांचा - ज्यांचा या प्रकरणाशी संबंध आला त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

हिरेन हत्या प्रकरणी माफीचा साक्षीदार बनण्यासाठी दबाव! चालकाचा दावा

पान १ वरून

न्यायालयाला दिली होती. मात्र त्यानंतर त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले नाही. त्यामुळे हा प्रकार अधिकृत नोंदीत यावा, यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

१७ जून २०२१ रोजी अटक करण्यात आलेल्या सोनीने एनआयएकडे आपला कबुलीजबाब नोंदवला होता. राष्ट्रीय तपास यंत्रणा अँटिलिया बॉम्ब-धमकी प्रकरण आणि त्यानंतर घडलेली हिरेन हत्या, या दोन्ही प्रकरणांचा तपास करत आहे. आपल्या कबुलीजबाबात सोनीने घटनाक्रम सविस्तर सांगितला होता. त्यामध्ये हिरेन यांचे अपहरण कसे करण्यात आले आणि त्यानंतर तो स्वतः चालवत असलेल्या गाडीतच त्यांची हत्या कशी करण्यात आली, याची माहिती दिल्याचे नमूद आहे.

गेल्या वर्षी येरवडा कारागृहातून सोनीने न्यायालयाला पत्र लिहून आपला कबुलीजबाब मागे घेण्याची किंवा रद्द करण्याची विनंती केली होती. मात्र न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली. कबुलीजबाब स्वेच्छेने देण्यात आला होता की नाही, याचा अंतिम निर्णय खटल्याच्या सुनावणीदरम्यान घेतला जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

मिस्त्रींच्या याचिकेनंतर टाटा ट्रस्टचा वाद चिघळला! श्रीनिवासन यांचा राजीनामा

पान १ वरून

ट्रस्टच्या संचालक मंडळाच्या रचनेवर आक्षेप घेतला. त्या करारनाम्यानुसार, संबंधित व्यक्ती पारसी झोरोस्ट्रियन धर्माची असावी आणि ती व्यक्ती नवसारी किंवा माजी बॉम्बे प्रेसिडेन्सी क्षेत्रातील कायमस्वरूपी रहिवासी असावी. मिस्त्री यांचा आरोप आहे की श्रीनिवासन आणि विजय सिंह या अटी पूर्ण करत नाहीत.त्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय कायदेशीरदृष्ट्या वैध ठरत नाहीत.

याशिवाय, मिस्त्री यांनी त्यांच्या स्वतःच्या कार्यकाळाच्या नूतनीकरणाबाबत झालेल्या मतदानावरही आक्षेप घेतला. ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांच्या कार्यकाळाच्या वाढीचा प्रस्ताव फेटाळला होता. या मतदानात नोएल टाटा, श्रीनिवासन आणि विजय सिंह यांनी विरोधात मत दिले, तर जहांगीर सी. जहांगीर आणि डारियस खंबाटा यांनी समर्थन केले होते. जिमी टाटा यांनी कोणतीही भूमिका स्पष्ट केली नव्हती. जर अपात्र विश्वस्तांची मते वगळली, तर त्यांचा कार्यकाळ न वाढवण्याचा ठराव आपोआप रद्द होईल. तसेच गेल्या दोन वर्षांपासून ट्रस्टची कोणतीही अधिकृत बैठक झालेली नाही. हा पारदर्शकतेचा अभाव आहे. त्यामुळे धर्मादाय आयुक्तांनी ट्रस्टच्या नोंदी आणि कामकाजाची चौकशी करावी आणि सर्व विश्वस्तांनी पात्रतेच्या अटी पूर्ण केल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे.

मदरशांवर बुलडोझरच चालवा टी. राजा यांचे वादग्रस्त विधान

पान १ वरून

सर्व मदरसे बंद करा. मदरशांमध्ये देशविघातक शिक्षण दिले जाते. त्यामुळे असे मदरसे बंद करण्याऐवजी पूर्णपणे उद्ध्वस्त करावेत. तसेच राज्यात बुलडोझरचा नियम लागू झाला आहे. फक्त मदरसे बंद केल्यास ते पुन्हा सुरू होऊ शकतात, त्यामुळे अनधिकृत मदरशांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. नितेश राणेंना माझे निवेदन आहे की, तुम्ही बोललेल्या वक्तव्याची अंमलबजावणी करा. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री तुम्हाला संभाजीनगरमध्ये औरंगजेबची कबर हटवण्यासाठी भीती वाटते आहे का? घरात शस्त्र ठेवा. देवाच्या गाभाऱ्यात शस्त्र ठेवणे कायदेशीर आहे. बाहेर काढून हल्ला केला तर तो वेगळा विषय आहे. जर युद्ध झाले , शस्त्र नसतील तर, तुम्ही काय करणार? कस लढणार? धर्मासाठी लढणाऱ्या लोकांनी बंदुकीचा परवाना घ्यावा. जिथे मदत लागेल तिथे आम्ही देऊ.

शुद्ध व नैसर्गिक
फोंडाघाट मध
ॲगमार्क
फोंडाघाट फार्मसी
मुंबई - १६. फोन : २४३० ८५४२

नवाकाळ
• मुंबई । सोमवार ६ एप्रिल, २०२६ • पान -८

उदय सामंतांची शरद पवारांशी भेट

मुंबई - उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांची सिल्व्हर ओक येथे भेट घेतली. त्यांच्या या भेटीदरम्यान नवी मुंबईतील शिंदे गटाचे नगरसेवक विजय चौगुले हेही उदय सामंत यांच्यासोबत उपस्थित होते. त्यामुळे या भेटीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना उदय सामंत म्हणाले की, ओपस स्पेसमध्ये कशापद्धतीने वृक्षारोपण करता येईल त्यासंदर्भात आमची चर्चा झाली. नाट्य परिषदचे प्रमुख विश्वस्त शरद पवार आहेत त्यांच्याशी परिषदेच्या कामासंदर्भात आम्ही आज शरद पवारांची भेट घेतली. अजित पवारांच्या निधनानंतर शरद पवारांची भेट झाली नव्हती, आज या भेटीत आम्ही त्यांची प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी विविध क्षेत्रांत भरीव कार्य केले असून त्यांचे मार्गदर्शन लाभणे महत्त्वाचे आहे.

महापौर रितू तावडे यांच्या पासपोर्ट नूतनीकरणास सत्र न्यायालयाची परवानगी

■ मुंबई

मुंबई पालिकेच्या महापौर रितू तावडे यांना सत्र न्यायालयाने पासपोर्ट नूतनीकरणाची परवानगी दिली आहे. शाळेतील शिक्षकांवर मारहाण केल्याच्या प्रकरणात त्यांच्याविरोधात खटला सुरू असतानाही ही परवानगीही देण्यात आली आहे.या प्रकरणात यापूर्वी तावडे यांनी दाखल केलेला खटल्यातून मुक्ततेचा अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यामुळे त्यांच्या विरोधातील खटला चालूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले.

रितू तावडे यांचा पासपोर्ट मे २०२५ मध्ये कालबाह्य झाल्याने त्यांनी नूतनीकरणासाठी न्यायालयाची परवानगी मागितली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीश वाय. पी. मनथकर यांनी या अर्जावर सुनावणी करताना निरीक्षण नोंदवले की, पासपोर्ट नूतनीकरण ही प्रशासकीय बाब असून त्याला विरोधी पक्षाकडून कोणताही आक्षेप घेण्यात आलेला नाही. वैध पासपोर्ट असल्यामुळे खटल्याच्या सुनावणीवर कोणताही परिणाम होणार नाही. त्यामुळे नूतनीकरणास परवानगी देण्यात आली. न्यायालयाने तावडे यांच्यावर काही अटीही घातल्या आहेत. न्यायालयाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्या परदेशात प्रवास करू शकणार नाहीत. २०१६ मध्ये शास्त्री नगर येथील महानगरपालिका शाळेत घडलेल्या घटनेशी संबंधित आहे. शिक्षकांच्या बदलीच्या वादातून झालेल्या या प्रकारणात तावडे आणि इतरांवर कर्मचाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप आहे.

ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है
राघव चड्ढांचा 'आप'ला पुन्हा इशारा

■ नवी दिल्ली

आम आदमी पक्षाचे राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा हे गेल्या काही दिवसांपासून राजकीय चर्चेत असून पक्षाने त्यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटवल्यानंतर वाद अधिकच चिघळला आहे. त्यांच्या जागी अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयानंतर राघव चड्ढा यांनी पक्षावर अप्रत्यक्ष टीका करत सलग तिसरा व्हिडिओ प्रसिद्ध केला. या व्हिडिओत त्यांनी, हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अजून बाकी आहे, असे म्हणत पक्षाला पुन्हा सूचक इशारा दिला आहे.

आम आदमी पक्षाकडून चड्ढा यांच्यावर संसदेत पंजाबचे प्रश्न प्रभावीपणे न मांडल्याचा आरोप करण्यात आला होता.

या आरोपांना उत्तर देताना चड्ढा यांनी संसदेत पंजाबसंदर्भात उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांचा सविस्तर आढावा व्हिडिओद्वारे घेतला. त्यांनी कॅप्शनमध्ये म्हटले की, हा व्हिडिओ प्रसिद्ध करण्यास भाग पाडलेल्या माझ्या 'आप'मधील सहकाऱ्यांसाठी हा एक छोटा ट्रेलर आहे. पिक्चर अजून बाकी आहे. पंजाब माझ्यासाठी केवळ

सलग तिसरा व्हिडिओ प्रसिद्ध

चर्चेचा विषय नाही, तर माझे घर, माझे कर्तव्य आणि माझा आत्मा आहे. माझ्यावर एकसारखेच प्रश्न आणि आरोप केले जात आहेत. हा योगायोग नसून एक सुनियोजित हल्ला आहे.

सुनेत्रा पवारांचा पहिला पाहणी दौरा
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी पहाटेच थेट भेट

■ बारामती

बारामती तालुक्यातील अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज पहिला पाहणी दौरा केला. त्यांनी आज पहाटेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट भेट घेतली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यपद्धतीचा वारसा जपत त्यांनी प्रत्यक्ष शेतात उतरून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना दिलासा दिला.

बारामती तालुक्यातील पणदरे, धुमाळवाडी आदी भागांत अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या ठिकाणी सुनेत्रा पवार यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली आणि त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी लवकरात लवकर पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

तसेच शासनामार्फत मदत त्वरीत देण्याचे आश्वासनही दिले. यावेळी त्यांनी सांगितले की, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी आधीच विविध अडचणींनी त्रस्त असतो, त्यात या गारपिटीने परिस्थिती अधिकच बिकट केली आहे.

समरजित घाटगे ८ एप्रिलला भाजपात घरवापसी करणार

■ कोल्हापूर

शरद पवार गटाचे कोल्हापूरचे नेते समरजित घाटगे हे भाजपात घरवापसी करणार आहेत. विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून उमेदवारी न मिळाल्याने घाटगे यांनी शेवटच्या क्षणी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करून निवडणूक लढवली होती. मात्र, आता त्यांनी भाजपामध्ये परतण्याचा निर्णय जाहीर केला आहे. येत्या ८ एप्रिल रोजी मुंबई येथील भाजपा प्रदेश कार्यालयात त्यांचा अधिकृत पक्षप्रवेश होणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

घाटगेंच्या घरवापसीमुळे मविआला, विशेषतः शरद पवार गटाला मोठा धक्का बसणार असल्याचे मानले जात आहे. या संदर्भात समरजित घाटगे म्हणाले की, मी डिसेंबर महिन्यातच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. महापालिका निवडणुकीनंतर मी माझी स्पष्ट भूमिका मांडली होती. शरद पवारांना पूर्वकल्पना देऊनच मी ही पुढची पावले उचलली आहेत. भाजपा प्रवेशाची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती. नगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये आमचे अनेक कार्यकर्ते भाजपाच्या चिन्हावर निवडून आले आहेत.

सोलापूर-हैदराबाद विमानसेवा १७ एप्रिलपासून सुरू होणार

■ सोलापूर

सोलापूर येथून हैदराबादसाठी विमानसेवा सुरू करण्यास हिरवा कंदील मिळाला असून, येत्या १७ एप्रिलपासून ही सेवा सुरू होणार आहे.

फ्लाय ९१ या कंपनीमार्फत ही विमानसेवा सुरू केली जाणार आहे. याआधी सोलापूर-गोवा आणि सोलापूर-मुंबई विमानसेवा सुरू केल्यानंतर आता हैदराबाद मार्गही सोलापूरशी जोडला जात आहे. या विमानसेवेचे तिकीट बुकिंग सुरू झाले असून, प्रवाशांना ३,८०० रुपये मोजावे लागणार आहेत. आठवड्यातील पाच दिवस म्हणजेच सोमवार ते शुक्रवार ही विमानसेवा चालेल. वेळापत्रकानुसार, दुपारी ३.२० वाजता सोलापुराहून निघणारे विमान सुमारे ४.२५ वाजता हैदराबादला पोहोचेल. त्यानंतर ४.५० वाजता हैदराबादहून सुटणारे विमान सायंकाळी ५.५० वाजता सोलापुरात दाखल होईल.

पतिव्रता म्हणणारी मोठे कुंकू लावते माजी आमदार राहुल बोंद्रे वादात

वक्तव्य मागे घेण्यास नकार

■ बुलडाणा

बुलडाणा जिल्ह्यातील चिखली मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी केलेल्या महिलांबाबतच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, त्यांनी आपले वक्तव्य मागे घेण्यासही नकार दिला आहे.

बोंद्रे यांची काल शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी भेट घेतल्याने ते शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना राहुल बोंद्रे यांनी महिलांचे उदाहरण देत वादग्रस्त विधान केले. ते

म्हणाले की, एखादी महिला स्वतःला पतिव्रता असल्याचे दाखवण्यासाठी मोठे कुंकू लावते आणि मोठे मंगळसूत्र घालते. पण प्रत्येकाला असे दाखवण्याची गरज नसते.

त्यांच्या या वक्तव्यामुळे चिखली शहरात महिलांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महिलांनी या विधानाचा निषेध करत शिवाजी चौकात आंदोलन केले. यावेळी शेकडो महिला एकत्र येत राहुल बोंद्रे यांच्या प्रतिमेला जोडे मारत जोरदार घोषणाबाजी केली. मात्र, मी चुकीचे बोललो नाही आणि माझे शब्द मागे घेणार नाही, असा ठाम पवित्रा बोंद्रे यांनी घेतला आहे.

गॅस एजन्सींना घरपोच सिलिंडर देणे बंधनकारक

पुरवठा विभागाचे आदेश

■ जळगाव

जळगाव जिल्ह्यातील गॅस एजन्सी धारकांना आता घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा केवळ घरपोच पद्धतीने करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जळगाव जिल्हा पुरवठा विभागाने याबाबत महत्त्वाचे आदेश जारी केले असून कार्यालयातून होणारे थेट वितरण तत्काळ बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

इंधन पुरवठ्यातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच गोदाम आणि कार्यालयाबाहेर ग्राहकांची होणारी गर्दी आणि त्यातून निर्माण होणारे सुरक्षेचे प्रश्न लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. या संदर्भात भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांच्या स्थानिक अधिकाऱ्यांना पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गॅस एजन्सींविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे ग्राहकांना गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहण्याची गरज उरणार नसल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शिरूरमध्ये अवकाळीचा तडाखा काढणीला आलेला कांदा सडला

■ पुणे

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, काढणीला आलेला कांदा शेतातच सडू लागल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. गेल्या चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे उत्तर पुणे जिल्हा परिसरात मोठे नुकसान झाले आहे. दिवसभर वाढते तापमान आणि दुपारनंतर अचानक कोसळणारा अवकाळी पाऊस यामुळे कांदा पिकावर दुहेरी संकट ओढवले आहे. गारपिटीचा तडाखा बसल्यानंतर वाढत्या उष्णतेमुळे कांदा शेतातच सडून खराब होत आहे. याबाबत नुकसानग्रस्त शेतकरी म्हणाले की, गेल्या तीन-चार दिवसांपासून सतत पाऊस पडत आहे.

एलएलबी परीक्षेत शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख! कारवाईची मागणी

■ मुंबई

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात आलेल्या एलएलबी (३ वर्षे) प्रवेश परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्यामुळे संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी संबंधित दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी पत्राद्वारे केली आहे.

२ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या एलएलबी (३ वर्षे) प्रवेश परीक्षेतील सामान्य ज्ञान विभागात शिवाजी महाराजांच्या मंत्रिमंडळावर प्रश्न असून त्याचे नाव काय होते, असा प्रश्न विचारण्यात आला होता. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक व आदर्श राज्यकर्ते असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अशा एकेरी भाषेत उल्लेख होणे ही अत्यंत खेदजनक बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. अनेक परीक्षार्थींनी आमदार राहुल कुल यांच्याकडे निवेदन देत तक्रार नोंदवली होती. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन कुल यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष येथील आयुक्तांना पत्र पाठवून प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मतदार पडताळणीत हलगर्जीपणा पुण्यात दोन अधिकाऱ्यांवर गुन्हा

■ पुणे

पुण्यात मतदार पडताळणीच्या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी दोन केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहानबाद शेख आणि प्रताप पाटील अशी संबंधित अधिकाऱ्यांची नावे असून, त्यांच्याविरोधात बंडगार्डन पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात आली आहे. आगामी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सध्याच्या मतदारांची २००२ च्या मतदार यादीशी पडताळणी (मॅपिंग) केली जात आहे. यासोबतच मतदारांच्या तपशीलातील नाव, लिंग, वय, फोटो, पत्ता आदी माहितीतील आवश्यक दुरुस्त्यांची कार्यवाहीही सुरू आहे. या कामासाठी संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार आदेश व नोटिसा देण्यात आल्या होत्या.

मध्य प्रदेशात तीन मजली इमारत कोसळली! २ ठार

■ अनुपपूर

मध्य प्रदेशमधील अनुपपूर जिल्हा येथे तीन मजली अग्रवाल लॉजची इमारत अचानक कोसळली. या दुर्घटनेत हनुमान दीन यादव (५५) व राम कृपाल यादव (४०) यांचा मृत्यू झाला. दोघेही इमारतीवर काम करत असताना हा अपघात घडला. जखमींना तातडीने शहडोल मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ, स्थानिक पथकांनी मदतकार्य केले. वाराणसी, भिलाई व इतर ठिकाणांहूनही पथके दाखल झाली होती. सुमारे १०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी तीन क्रेन आणि जेसीबीच्या सहाय्याने ढिगारा हटवला.

चंद्रपुराच्या मिंथुरात वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

■ चंद्रपूर

चंद्रपूर जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाही. नागभीड तालुक्यातील मिंथुर शेतशिवारात वाघाच्या हल्ल्यात हरिदास कुबडे (५८) या शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांकडून वनविभागाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

मिंथुर येथील रहिवासी हरिदास कुबडे हे काल सकाळी मोहफुले वेचण्यासाठी शेतात गेले होते. मात्र सायंकाळपर्यंत ते घरी परतले नाहीत. यामुळे चिंताग्रस्त झालेल्या कुटुंबियांनी ग्रामस्थांच्या मदतीने शोध सुरू केला. रात्री अंधार व वन्यप्राण्यांच्या भीतीमुळे शोधकार्याला अडथळे आले. आज सकाळी वनविभागाच्या पथकासह ग्रामस्थांनी पुन्हा शोधमोहीम राबवली असता, शेताजवळील नाल्यात कुबडे यांचे छिन्नविछिन्न अवस्थेतील अवशेष आढळून आले.

दहिसर-मीरा रोड मेट्रोचा आता ७ एप्रिलला शुभारंभ

■ भाईंदर

बहुचर्चित दहिसर-मिरारोड मेट्रो मार्गिकेचा शुभारंभ आणखी एक दिवस लांबणीवर पडला आहे. हा कार्यक्रम आता सोमवार ६ एप्रिल ऐवजी मंगळवार ७ एप्रिल रोजी संपन्न होणार आहे.

दहिसर- भाईंदर मेट्रो मार्गिका ९ मधील दहिसर ते काशिगाव या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असले तरी नेत्यांच्या वेळेमुळे शुभारंभाचा कार्यक्रम तिसऱ्यांदा लांबणीवर पडला आहे. सुरुवातीला ३ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या मेट्रोचे लोकार्पण केले जाणार होते. नंतर तो सोमवार ६ एप्रिल रोजी निश्चित करण्यात आला होता. कार्यक्रमाची तयारी सुरू असताना शनिवारी हा कार्यक्रम एक दिवसांनी पुढे ढकलल्याचे जाहीर करण्यात आले.

बिनविरोध निवडणूक म्हणजे मतदारांवर अन्याय आहे

खा. राऊत यांचे वक्तव्य

■ मुंबई

राहुरी आणि बारामतीमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकीसंदर्भात महाविकास आघाडीमध्ये चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडी एकसंध असून चर्चेनंतर निर्णय घेतला जाईल. निवडणुका बिनविरोध झाल्या पाहिजेत, हा अट्टाहास चुकीचा असून ज्याला सरकारला मतदान करायचे नाही त्यांनी काय करायचे? हा त्यांच्यावर अन्याय आहे, असे वक्तव्य उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी केले.

बारामतीतील पोटनिवडणुकीबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी

उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. पण त्या भाजपाबरोबर निवडणूक लढवत असून त्यांची युती आहे. यावर आमच्या पक्षामध्ये चर्चा झाली. सुनेत्रा पवार या काही महाविकास आघाडीच्या उमेदवार नाहीत. अशावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केलेली असली तरी अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेच याबाबत निर्णय घेतील. बारामतीमध्ये उमेदवार का देऊ नये? निवडणूक आहे. अजित पवार यांच्याबद्दल एक आदर आहे. पण निवडणुका लढवायच्याच नाही, बिनविरोधच झाल्या पाहिजे हा अट्टाहास चुकीचा आहे. यशवंतराव चव्हाण यांनासुद्धा निवडणुकीला सामोरे जावे लागले होते.

पंढरपुरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अनधिकृत पुतळा

■ पंढरपूर

माढा विधानसभा मतदारसंघात अनधिकृत पुतळे उभारण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून आता पंढरपूर तालुक्यातील भोसे गावात

पोलीस बंदोबस्त तैनात

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा अज्ञातांकडून बसवण्यात आला. ग्रामपंचायत समोरील चौकात सिंहासनाधिष्ठित देखणा पुतळा उभारण्यात आल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. या घटनेनंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. सध्या परिस्थिती नियंत्रणात आणि शांत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

मराठवाड्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातही अनधिकृत पुतळे उभारण्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. यापूर्वी अंजनगाव खेलोबा येथे अशाच प्रकारामुळे तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर आता भोसे येथील घटनेने पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राफेल डीलवरून फ्रान्सची कोंडी युएईने प्रकल्पातून घेतली माघार

फ्रान्सचा महत्त्वाकांक्षी राफेल एफ-५ प्रकल्प मोठ्या संकटात सापडला. संयुक्त अरब अमिरातीने (युएई) या प्रकल्पातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे फ्रान्सच्या संरक्षण वर्तुळात खळबळ उडाली. या निर्णयाचा थेट परिणाम भारताच्या आगामी ११४ राफेल विमानांच्या खरेदीवर होऊ शकतो अशी शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

■ पॅरिस

युएई या प्रकल्पात सुमारे ४ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार होता. या बदल्यात युएईने फ्रान्सकडे राफेल एफ-५चा सोर्स कोड आणि 'ऑप्ट्रॉनिक्स' तंत्रज्ञानाची मागणी केली होती. परंतु फ्रान्सने आपल्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या संवेदनशील तंत्रज्ञानाची माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला होता. यामुळे युएईने या प्रकल्पातून माघार घेतली असल्याची चर्चा आहे. यामुळे या प्रकल्पाचा संपूर्ण खर्चाचा भार एकट्या फ्रान्सवर येऊन पडला आहे. परिणामी विमानांच्या वितरणास विलंब होण्याची शक्यता आहे. भारत लवकरच ४० अब्ज डॉलर खर्चून ११४ राफेल विमानांची खरेदी करणार आहे. यामध्ये २४ प्रगत एफ-५ मॉडेलचाही समावेश आहे.

एलफिन्स्टनचा मेगा ब्लॉक लांबला दादर-सीएसएमटी वाहतूक ठप्प

■ मुंबई

मुंबईतील एलफिन्स्टन रोड रेल्वे स्थानक परिसरातील ११३ वर्षे जुना पूल पाडण्याच्या कामादरम्यान रेल्वे प्रशासनाचा मेगा ब्लॉक नियोजित वेळेपेक्षा लांबला. यामुळे आज सकाळी दादर ते सीएसएमटी दरम्यानची रेल्वे वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प होऊन प्रवाशांचे हाल झाले.

एलफिन्स्टनचा जुना पूल पाडण्यासाठी काल रात्री सुमारे साडेअकरा वाजताच्या सुमारास काम सुरू झाले होते. सकाळी ६ वाजेपर्यंत काम पूर्ण करून सेवा पूर्ववत केली जाणार होती. मात्र, हे काम वेळेत पूर्ण न झाल्याने मेगा ब्लॉकचा कालावधी सुमारे दोन तासांनी वाढला. या वाढीव ब्लॉकचा फटका सर्वसामान्य प्रवाशांना बसला.

सकाळच्या गर्दीच्या वेळेत दादर-सीएसएमटी मार्गावरील लोकल सेवा बंद होत्या. याशिवाय, लांब पल्ल्याच्या गाड्यांवरही या ब्लॉकचा परिणाम झाला. काही गाड्या उशिराने धावल्याने बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय झाली.